cmyk

## संपादकीय

### बिहारमध्ये पुन्हा नितीशच का?

राजकारण ही नेहमीच सरकत्या गाळासारखी असते, आणि प्रत्येक निवडणूक आपल्यासमोर तीच जुनीच रचना आणते. बिहारचा राजकीय चित्रपटमंच पुन्हा एकदा 'नितीश-केंद्रित' रंगभूमीवर उभा आहे, पण सवाल नेहमीचाच आहे. खरा बदल कधी? आजही जनतेच्या मनात हा प्रश्न गंभीरतेने रुजतो.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९९ | रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# पीएम किसानचे २००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात कधी येणार?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना २१ व्या हप्त्याचे २००० रुपये १९ नोव्हेंबरला मिळणार आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात एका वर्षात तीन समान हप्त्यांमध्ये ६००० रुपये पाठवण्यात येतात. पीएम किसान सन्मान निधी योजना फेब्रुवारी २०१९ पासून सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेच्या २० हप्त्यांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आली आहे.**




पीएम किसान सन्मान निधी योजनेची सुरुवात २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी करण्यात आली होती. केंद्र सरकारने २४ फेब्रुवारी २०१९ ला पीएम किसान सन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता जारी केला होता. तेव्हापासून आतापर्यंत २० हप्त्यांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. २० व्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात २ ऑगस्ट रोजी पाठवण्यात आली होती. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या वेबसाईटवरील माहितीनुसार १९ नोव्हेंबरला योजनेच्या २१ व्या हप्त्याची रक्कम पाठवली जाणार आहे. त्या माहितीनुसार शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १८००० कोटी रुपये पाठवण्यात येणार आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याची रक्कम पूरग्रस्त राज्यांना अगोदरच देण्यात आली आहे. पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरच्या शेतकऱ्यांना पूरस्थितीतून सावरण्यासाठी पीएम किसानच्या हप्त्याची २१ व्या रक्कम देण्यात आली आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेतून आतापर्यंत ११ कोटी शेतकऱ्यांना ३.७० लाख कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. ही योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत २० हप्त्यांचे एकूण ४०००० रुपये प्रत्येक ▶▶ पान २ वर

### ई – केवायसी करणे आवश्यक

शेतकऱ्यांना २१ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असेल तर ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. जे शेतकरी ई केवायसी करणार नाहीत त्यांना २००० रुपये मिळणार नाहीत. ई-केवायसी सीएससी सेंटरवर जाऊन करता येईल. किंवा पीएम किसानच्या वेबसाईटला भेट देऊन देखील करता येईल. ओटीपी आधारित ई केवायसी आणि बायोमेट्रिक ई केवायसी, फेस आधारित ई केवायसी असे पर्याय उपलब्ध आहेत.

## थोडक्यात...

### छ.संभाजीनगरमध्ये भाजप नेत्याचा खून

छ. संभाजीनगर: भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षाचा मृतदेह आढळला. गंगापूर तालुक्यातील एका पुलाजवळ कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला त्यामुळे एकच खळबळ उडाली. भाजप नेत्याच्या मृत्यूचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गंगापूर तालुक्यातील भालगाव येथील रहिवासी असलेले भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश रघुनाथ टेमकर यांचा मृतदेह आढळून आला. गंगापूर तालुक्यातील नारावाडी शिवारात रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडीमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### राहुल गांधींना मोठा दिलासा..!

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील न्यायालयाने शनिवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) कार्यकर्त्याने काँग्रेस नेते राहुल गांधींविरुद्ध दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्याची सुनावणी ६ डिसेंबरपर्यंत स्थगित केली आहे. भिवंडीचे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ विभाग, पी.एम. कोळसे सध्या या खटल्याची सुनावणी करत आहेत. जेव्हा हे प्रकरण सुनावणीसाठी आले तेव्हा तक्रारदार राजेश कुंटे यांचे वकील प्रबोध जयवंत यांनी निजामपुरा पोलिस ठाण्याचे निरीक्षक अशोक सायकर यांची साक्षीदार म्हणून चौकशी करण्याची परवानगी मागणारा अर्ज सादर केला. न्यायालयाने निजामपुरा पोलिसांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आणि अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

### २८ काळविटांचा अचानक मृत्यू; चौकशीचे आदेश

बेळगाव: बेळगाव शहरापासून अवघ्या काही अंतरावर पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाला लागून भूतरामनहट्टी गावात राणी कित्तूर चन्नमा हे प्राणी संग्रहालय आहे. या प्राणी संहग्रहालयातील २८ काळविंटाचा अचानक मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश कर्नाटकचे वनमंत्री ईश्वर खांडरे यांनी दिले आहेत. शनिवारी प्राणी संग्रहालयातील वीस काळविटांचा अचानक मृत्यू झाल्यामुळे वन खात्यात देखील खळबळ माजली आहे. नोव्हेंबर १३ रोजी आठ काळविटांचा मृत्यू झाला होता. केवळ तीन दिवसांच्या कालावधीत अठ्ठावीस काळविटांचा मृत्यू झाल्याने या मृत काळविटांच्या मृत्यूचे कारण शोधणे हे वन विभागापुढे आव्हान बनले आहे.

### श्रीनगरमध्ये पोलीस ठाण्यात भीषण स्फोट, ९ ठार

श्रीनगर: जम्मू- काश्मीरची राजधानी श्रीनगरच्या बाहेर असलेल्या नौगाम पोलिस स्थानकात शुक्रवारी रात्री उशिरा भीषण स्फोट झाला. त्यात ९ जणांचा मृत्यू झाला असून ३२ जखमी झाले आहेत. या स्फोटाची तीव्रता एवढी मोठी होती की त्याचे धक्के अनेक किलोमीटर अंतरावर जाणवले. फरिदाबाद येथून जप्त केलेल्या स्फोटकांच्या साठ्यातून नमुने घेण्याची प्रक्रिया दोन दिवसांपासून सुरु आहे. याच दरम्यान ही घटना घडली. जम्मू आणि काश्मीरचे पोलिस महासंचालक नलिन प्रभात यांनी नौगाम पोलिस स्थानकातील स्फोटाची घटना ही एक दुर्घटना असल्याचे म्हटले आहे. त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की पोलिस स्थानकातील स्फोट हा कोणताही दहशतवादी कट अथवा हल्ला नव्हता तर केवळ एक अपघात होता. एफएसएल पथकाकडून नमुने घेत जात असताना हा स्फोट झाला. पण याची सविस्तर चौकशी केली जात आहे.

# सत्ताधाऱ्यांनी महिलांना पैसे वाटल्याचा शरद पवारांचा दावा, फडणवीस म्हणाले, तुम्हालाही संधी होती...!

**मुंबई । प्रतिनिधी**

बिहारमध्ये सगळ्या महिलांच्या खात्यात १० हजार भरले, त्याचा हा परिणाम झाला असावा. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीआधी पैसे वाटणे अयोग्य असून, हे चिंताजनक आहे. पैसे देऊन निवडणूक लढवणे हे पारदर्शकपणाचे लक्षण आहे का? असा सवाल ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सत्ताधाऱ्यांना केला आहे. तर याल उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, आत्मपरिक्षण करा, सगळ्यांना संधी होती मात्र काही जणांना ते जमले नाही.



बिहार विधानसभेच्या लागलेल्या धक्कादायक निकालावर बोलताना शरद पवार म्हणाले की, मतदान झाल्यानंतर मी काही लोकांशी बोललो, त्यांच्याकडून मला फिडबॅक मिळाला की, या निवडणुकीचे मतदान महिलांनी हातात घेतले. १० हजार रुपये ही काही लहान रक्कम नाही, असे पवार यांनी नमूद केले. कोणतीही निवडणूक असो ती स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने झाल्या पाहिजे. यावर आता निवडणूक आयोगाने विचार करावा, असे पवार यांनी सूचित केले आहे. महाराष्ट्रामध्येही निवडणुकीच्या आधी पैसे वाटण्यात आले. पण प्रत्येक मताला पैसे देतात तसे नाही. तर सरकारवतीने अधिकृत पैसे देण्यात आले. म्हणजेच लाडकी बहीण योजना. बिहारमध्येही असेच झाले. येथून पुढच्या निवडणुकीत ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी मतदानाच्या आधी पैशांचे वाटप करुन निवडणुकीला सोमारे जायचे असे ठरवले तर निवडणूक प्रक्रियेवरील लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल, अशी भीती शरद पवार यांनी व्यक्त केली. शरद पवार यांच्या वक्तव्यानंतर त्यांना आणि सगळ्याच विरोधकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, जो जिता वही सिंकदर... पराभव स्वीकारता आला पाहिजे. मोकळ्या मनाने आपल्या चुका कबूल केल्या पाहिजेत. आत्मपरीक्षण करायला हवे. पण विरोधी पक्षाला आत्मपरीक्षण मान्य नाही, असे प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र ▶▶ पान २ वर

# काँग्रेसचा स्वबळाचा नारा आघाडीतील मित्रपक्षांना धक्का

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र काँग्रेसने मुंबई महानगर पालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. कार्यकर्त्यांना संबोधित करताना महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी स्वबळाचा नारा दिला आहे. यामुळे मुंबईत काँग्रेस स्वबळावर निवडणुकीला सामोरी जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी मुंबईत काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी स्वबळाचा नारा दिला आहे. या बैठकीला पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



नुकत्याच बिहार विधानसभेच्या निकालाने भाजपला मोठे यश मिळवून दिले असून त्यांचे बळ ▶▶ पान २ वर

# आधार कार्ड नागरिकत्वाचा नव्हे फक्त ओळखीचा पुरावा

## निवडणूक आयोगाचा सुप्रीम कोर्टात पुनरुच्चार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

आधार कार्ड केवळ मतदार यादीत समावेश करू इच्छिणाऱ्या अर्जदारांची ओळख पडताळण्यासाठी वापरला जात आहे, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून नाही, असा पुनरुच्चार भारतीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयासमोर केला आहे.

नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ६ मध्ये जन्मतारखेचा पुरावा म्हणून आधार कार्ड वापरण्याविरुद्ध निर्देश देण्यात आले आहेत. आधारचा वापर ओळख



पडताळणीपुरता मर्यादित करावा आणि फॉर्म-६ अर्जांमध्ये जन्मतारखेचा पुरावा म्हणून त्याचा वापर रोखावा, अशी मागणी करणारी याचिका अश्विनी कुमार उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. यावर निवडणूक आयोगाचे सचिव संतोष कुमार दुबे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. निवडणूक आयोगाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी कायदा, १९५० च्या कलम २३(४) नुसार आधार फक्त ओळखीचा पुरावा म्हणून वापरला जात आहे. निवडणूक कायदे (सुधारणा) कायदा, २०२१ द्वारे, मतदार यादीतील डेटा आधार इकोसिस्टमशी जोडण्यासाठी आरपी कायद्याच्या कलम २३ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. वेगवेगळ्या ठिकाणी एकाच व्यक्तीच्या अनेक नोंदणीस ▶▶ पान २ वर

# आदिवासींच्या जमीनीसह संस्कृतीचे रक्षण करु–मुख्यमंत्री

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही ▶▶ पान २ वर

# थंडीचा कडाका वाढण्याचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात अजूनही सकाळी थंडी आणि दुपारी उन्हाचा चटका, अशी परिस्थिती जाणवत आहे. धुळे येथे राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे तर कोकणासहीत काही भागात कमाल तापमानाचा पारा कायम आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम असल्याने राज्यातही थंडी वाढेल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

राज्यात किमान तापमानातील घट कायम असल्याने सकाळी चांगलीच थंडी जाणवत आहे. राज्यभरात थंडीचा कडाका आहे. शनिवारी धुळे येथे सर्वात कमी ८.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तर जळगाव येथे ८.७ अंशाची नोंद झाली. अहिल्यानगर ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये अजित दादाच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी टायमिंग साधत दिला राजीनामा

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे सुपूर्द केला आहे. स्थानिक स्तरावर पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत जाणीवपूर्वक डावलले जात असल्याने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे पत्रात म्हटले आहे. मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर



डॉ.योगेश क्षीरसागर यांनी वेळ साधल्याने राष्ट्रवादीला मोठ्या अडचणी ▶▶ पान २ वर

### पुढील भूमिका लवकरच–डॉ.क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या बीड विधानसभा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर स्थानिक राजकारणात उत्सुकता वाढली आहे. लवकरच आपल्या पुढील राजकीय भूमिकेबाबत घोषणा करणार असल्याचे त्यांनी संकेत दिले आहेत.

### पंडितांची कसोटी लागणार

गेवराई नगरपालिकेमध्ये युती होण्यापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उमेदवार जाहीर केल्यानंतर बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यावर आपली छाप पाडत स्वतंत्र सुभा उभा केला असला तरी गेवराईनंतर बीडमध्ये पंडितांना कसोटीचा सामना करावा लागणार आहे.

# मराठवाड्यात काँग्रेसची अवस्था मुझे गिनो




राज्य लोकतंत्र

● सुभाष चौरे ●

**राज्यात नगरपालिकेची रणधुमाळी सुरू आहे मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये बहुतांशी नगरपरिषदेच्या निवडणुका याच टप्प्यात होत आहेत. उद्या शेवटचा दिवस उमेदवारी अर्जासाठी असला तरी राष्ट्रीय काँग्रेसची अवस्था मात्र मुझे गिनो सारखी झाली आहे. एकेकाळी सत्ताधारी असलेला हा पक्ष आता कार्यकर्ते शोधत असल्याचे चित्र मराठवाड्यात दिसत आहे.**

राष्ट्रीय काँग्रेस महाविकास आघाडीमध्ये आहे. काँग्रेस राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट या महाविकास आघाडी मध्ये काँग्रेस असली तरी मराठवाड्यात सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेसला मात्र स्थान दिले जात नसल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरसह बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली आणि जालना या आठ जिल्ह्यातील बहुतांशी नगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकीमध्ये भाजप शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांची महायुती तर काँग्रेस राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट यांची आघाडी या माध्यमातूनच निवडणुका होतील अशी अपेक्षा होती मात्र कुठेच युती किंवा आघाडी दिसत नाही.



नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेक कार्यकर्त्यांचा ओढा भाजप शिवसेना आणि राष्ट्रवादी या पक्षाकडे असल्याचा दिसतो, मात्र राज्यात आणि देशात कधीकाळी प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसची चर्चा कुठेच होताना दिसत नाही. बीड, धाराशिव, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यामध्ये तर काँग्रेसला कार्यकर्ता आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक पक्षांनी आपल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. अगदी त्याचबरोबरीने काँग्रेस पक्षाने देखील घेतल्या मात्र त्यांच्याकडे उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या नगण्य होती. बीडमध्ये बोटावर मोजण्या एवढेच कार्यकर्ते सोडले तर काँग्रेसला कार्यकर्ताच दिसत नाही. कोण तालुकाध्यक्ष आहे आणि कोण जिल्हाध्यक्ष ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:६४.५० क्विंटल | २,३६२ | ३,००० | २,६२७ |
| ज्वारी/हायब्रिड : ४७.५० क्विंटल | २,५०० | ४,१५१ | ३,०४७ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ८.५० क्विंटल | ६,५६१ | ६,५६१ | ६,५६१ |
| उडीद : ३.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| बाजरी: ४२.५० क्विंटल | २,१०० | २,९६० | २,७५३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन: ८७.०० क्विंटल | ४,४५० | ४,६५० | ४,५८७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,५०० | ६,९०० | ६,२०० |

cmyk

## अग्रलेख

# बिहारमध्ये पुन्हा नितीशच का?

राजकारण ही नेहमीच सरकत्या गाळासारखी असते, आणि प्रत्येक निवडणूक आपल्यासमोर तीच जुनीच रचना आणते. बिहारचा राजकीय चित्रपटमंच पुन्हा एकदा 'नितीश-केंद्रित' रंगभूमीवर उभा आहे, पण सवाल नेहमीचाच आहे. खरा बदल कधी? आजही जनतेच्या मनात हा प्रश्न गंभीरतेने रुजतो. परंतु राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर, सामाजिक विकास आणि लोकमताच्या दृष्टिकोनातून काही महत्वाचे पैलू दुर्लक्षित राहतात. त्यातच महिलांना १० हजार रुपये जमा करून दिलेला निधी, रोजगारविषयक योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेतील सहभाग या सारख्या मोलाच्या विषयांचा समावेश होतो. महिलांना १० हजार रुपये जमा करण्याचा उपक्रम ही केवळ आर्थिक मदत नसून, सशक्तीकरणाचे प्रतीक आहे. पण, आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिणाम यामध्ये तफावत असल्याचे अनेक अभ्यास सूचित करतात. फक्त रक्कम जमा होणे पुरेसे नाही; त्याचा खऱ्या अर्थाने निर्णयक्षमता, आर्थिक स्वावलंबन, आणि सामाजिक सन्मान यावर परिणाम झाला का, हे पाहणे अत्यावश्यक ठरते. अनेक स्त्रियांनी या निधीचा उपयोग वैयक्तिक उत्पन्न वाढवण्यासाठी, व्यवसाय सुरु करण्यासाठी किंवा कुटुंबातील गरजा भागवण्यासाठी केला आहे, तर काहीजण फक्त आकड्यांमध्येच मर्यादित राहिल्या आहेत. त्यामुळे सरकार आणि प्रशासनासाठी ही एक सत्यापनाची कसोटी ठरत आहे.

बिहारमध्ये, नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांभोवती घडणारे फेरफार, पक्षांतील गटवाटा, आणि तिकिटांचे खेळ हे नेहमीच जनतेच्या लक्षात येतात. "पुन्हा नितीशच का?" हा प्रश्न फक्त पत्रकारांच्या किंवा सामाजिक विश्लेषकांचा नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचा अनुभव झाला आहे. त्याच्या नेतृत्वाखालील सरकारने अनेक सामाजिक व आर्थिक योजनांची अंमलबजावणी केली, पण सर्व स्तरावर समावेश आणि बदलाचे प्रमाण कितपत दिसले, हा विषय नेहमीच चर्चेचा मुद्दा राहतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये हे अधिक स्पष्ट होते. प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपंचायत, आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत, नेता कोणत्या गटाला प्राधान्य देतो, हे ठरवणे महत्त्वाचे ठरते. "हाडाचे कार्यकर्ते" आणि "लाडाचे कार्यकर्ते" यांच्यातील संघर्ष फक्त सत्ता संबंधित नाही; त्यामागे राजकीय संस्कृती, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता, आणि स्थानिक विकासावर प्रभाव या गोष्टीही आहेत. या संदर्भात महिलांच्या सशक्तीकरणाचे उपाय, आर्थिक मदतीचे वितरण, आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागाची परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. महिलांच्या निधीच्या बाबतीत, काही जिल्ह्यांमध्ये आर्थिक मदतीचा परिणाम दिसून येत आहे. महिलांनी छोट्या उद्योगांना सुरुवात केली, काहीजण शिक्षणासाठी निधीचा उपयोग करत आहेत, तर काहीजण गावच्या स्वयंसेवी कार्यक्रमात सक्रिय झाली आहेत. परंतु काही ठिकाणी निधी फक्त आकडेवारीतच मर्यादित आहे. त्यामुळे सरकारसाठी ही एक शिकवणारी प्रक्रिया आहे. फक्त योजना घोषित करणे पुरेसे नाही; त्याचा प्रत्यक्ष परिणाम कसा होत आहे, याची मोजणी आणि विश्लेषण करणे गरजेचे आहे.

राजकारणातील "पुन्हा नितीशच" संदर्भात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की नेत्यांच्या नेतृत्वाखाली होणारा विकास, योजना, आणि सामाजिक सशक्तीकरण यांची जोड स्थानिक लोकसंख्येच्या अपेक्षांशी सुसंगत आहे का, हे तपासणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीत फक्त नेतृत्वाचे नाव पुरेसे नसते; प्रभावी धोरण, कार्यान्वयन आणि सहभागी नागरिक हे सर्व घटक एकत्र येऊन बदल घडवतात. अर्थव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण या विषयांमध्ये मिळणारा परिणामच खऱ्या अर्थाने लोकशाहीची कसोटी ठरतो. नितीशकडे पुन्हा एकदा सत्ता आली तरी, प्रश्न असतो: अस्सल बदल, स्थानिक सहभाग, आणि प्रत्यक्ष परिणाम कधी दिसतील? महिला निधी, आरोग्य योजना, रोजगार उपक्रम, आणि स्वराज्य संस्था निवडणुकीतील सक्रिय सहभाग हे सर्व घटक हेच दाखवतात. विकासाच्या प्रक्रियेत जनतेचा सहभाग कितपत आहे आणि निर्णय कितपत समावेशी आहेत. शेवटी, "पुन्हा नितीशच का?" हा प्रश्न फक्त नावावर थांबत नाही; तो लोकशाहीच्या कार्यप्रणाली, सहभाग, आणि परिणामकारकतेवर प्रश्न उभा करतो. महिलांना दिलेली १० हजार रुपयांची निधी योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग, आणि नेत्यांच्या धोरणांची पारदर्शकता हे सर्व एकत्रित करूनच आपण खऱ्या अर्थाने सशक्त, परिणामकारक, आणि समावेशी लोकशाहीची उभारणी करू शकतो.

# नवनाथ शिराळे यांच्या वाढदिवसानिमित्त हजारो भाविक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्वात प्रसिद्ध असलेले ठिकाण म्हणजे श्रीक्षेत्र पेंडगाव या ठिकाणी सर्व भाविक भक्तांच्या नवसाला पावणारे असे भगवान श्री महारुद्र देवता आहेत येथे दर शनिवारी या ठिकाणी मराठवाड्यासह महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात म्हणून बीड जिल्ह्यातील सर्वात उत्कृष्ट देवस्थान व सर्वांचे नवसाला पावणारे असे श्रीक्षेत्र पेंडगाव येथील श्री हनुमान महाराज आहेत या ठिकाणी आज बीड जिल्ह्यामध्ये ज्यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आहे राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील तसेच देव देश धर्म यासाठी सातत्याने अग्रेसर असलेले सर्वांच्या सुख दुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे सर्वांना वेळोवेळी मदत करणारे असे सर्वांचे लाडके लोकप्रिय सर्वांना अण्णा म्हणून परिचित असलेले भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त आज या ठिकाणी उपस्थित असलेल्याहजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या पवित्र मंगलमय वातावरणामध्ये साजरा करण्यात आला माननीय अण्णांच्या हस्ते श्री भगवान महारुद्राचे महापूजा व श्री रुद्राभिषेक देखील श्री ब्रह्मवृंदांच्या पवित्र श्री वेद मंत्राच्या जयघोषात संपन्न झाला यावेळी या ठिकाणचे सर्व मंदिर परिसर तसेच मंदिराच्या बाहेरील परिसर श्री वेद मंत्राच्या पवित्र जय घोषाने दुमदुमून गेला होता तसेच येथे उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांनी आज महाप्रसादाचे सेवन केले मा श्री नवनाथ जी अण्णांच्या वाढदिवसानिमित्त शिरोळे पाटील यांच्याकडून येथे येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे उत्तम प्रकारे अतिशय कॉलिटीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या ठिकाणी पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ तसेच मराठवाड्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्वच राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील तसेच वकील डॉक्टर इंजिनियर्स पत्रकार सर्व मान्यवर मंडळी यांनी देखील या ठिकाणी येऊन श्री भगवान श्री महारुद्राचे दर्शन घेऊन मा अण्णांना वाढदिवसानिमित्त मनस्वी भरभरून शुभेच्छा दिल्या व सर्व या ठिकाणी उपस्थित असलेले भाविक भक्तांनी अण्णांना उदंड आयुष्य लाभावे अण्णांच्या हातून भविष्यात सातत्याने असेच श्री देव देश व धर्म या साठी सातत्याने कार्य घडत राहावे अशी प्रार्थना ही पेडगाव येथील श्री भगवान महारुद्रच्या चिरडे सर्वांच्या उपस्थितीत करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच भारतीय जनता पार्टीमध्ये नुकतेच प्रवेश केलेले गेवराई चे माजी आमदार तथा माजी मंत्री मा श्री बदामरावजी आबा पंडित साहेब व सर्जेराव तात्या तांदळे साहेब प्रशांत डोरले अशोक जी लोढा साहेब सलीम जहागीर साहेब तसेच गणेश जी लांडे पाटील सह आदित्य भैय्या सारडा व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने अण्णांच्या वाढदिवसानिमित्त अण्णांना शुभेच्छा देण्यासाठी व महाप्रसाद सेवन करण्यासाठी श्रीक्षेत्र पेडगाव या ठिकाणी उपस्थित होते तसेच लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर साहेब तसेच माजी नगरसेवक बाबुरावजी परळकर साहेब बीड जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी तक्षशिला सोनवणे मॅडम तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाची बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर व मिराताई गांधले सचिन शहागडकर विलास बापू बडगे सखाराम मस्के एडवोकेट जाधव साहेब बाळासाहेब जाधव देविदास नागरगोजे व भाग्यश्री ताई ढाकणे संध्या राजपूत प्रीती कुकडे जा कल्याण व दाजी वाघमारे रामनाथ डाके कंटाळे सर सुरेश शेटे चंद्रसेन मनेरी पाटील रमेश जमदाडे ज्ञानदेव डाके चंद्रकांत मुळे शिवाजी नाईक चंद्रकांत नाईक बाळासाहेब नाईक रामकिसन जगताप किशोर काळकुटे दहिवाळ साहेब जाधव साहेब तावरे साहेब नाटकर साहेब वाघमारे साहेब अर्जुन सह जाधव बीड शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व महायुतीचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच डॉक्टर वकील प्राध्यापक पत्रकार व सर्व पेंडगाव परिसरातील पंचक्रोशीतील सर्व नागरिक सर्व भाविक भक्त मोठ्या हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# मंठा तालुक्यात कष्ठरोग शोध मोहीम अभियान



मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या दरम्यान कुष्ठरोग शोध मोहीम अभियान सन २०२७ प्रर्यय शुन्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय साध्य करण्याचे दिशेने वाटचाल करण्यासाठी या ही मोहीम आयोजित करण्यात आली असून याचा उद्देश नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराने संसर्गाची साखळी खंडत करून होणारा प्रसार कमी करणे आहे त्या अनुषंगाने मंठा तालुक्यात ही मोहीम राबविण्यात येणार आहे यामध्ये १७१०३८ लोकसंख्या ३४२०८ घरे याची तपासणी २६८ टिम मार्फत करण्यात येणार आहे व प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयस सदरील अभियान मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्हा परिषद जालना चे मुख्यधिकारी याचे पत्र सुध्दा देण्यात येणार त्या अनुषगाने आज मंठा येथे सर्व आरोग्य अधिकारी आरोग्य कर्मचारी याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सहाय्यक संचालक कुष्ठरोग जालना डॉ. सुधाकर शेळके यांनी मार्गदर्शन करताना मंठा तालुक्यातील सर्व जनतेने आपली तपासणी या अभियान कालावधी करावे असे अहवान केले आहे हे अभियान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ जयश्री भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे या कार्यशाळेस तालुका आरोग्य अधिकारी डॉ जगन्नाथ कुंडकर वैद्यकीय अधिकारी डॉ शिवाजी निलवर्ण डॉ संदिप हजारे डॉ प्रसन्नजीत वानखेडे आरोग्य सहाय्यक विलास देशमुख आरोग्य सहाय्यक सुजीत या वाघमारे कुष्ठरोग तज्ञ शाम सांवत श्रीमती कुसुम बुधवंत यांच्या सह समुदाय आरोग्य अधिकारी आरोग्य कर्मचारी गटपर्वेतक हजर होते.



# परतूर नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकणार -जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे

परतूर । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात परतूर शहरात अनेक विकासाभिमुख कामे झाल्यामुळे परतूर शहरातील जनता शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील आणि नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकणार, असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी व्यक्त केला.

शनिवार (ता. १५) रोजी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने परतूर नगरपरिषद अध्यक्षपदासाठी सौ. रेणुका दीपक हिवाळे यांनी आपले नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांकडे दाखल केले. या वेळी जिल्हाप्रमुख बोराडे बोलत होते. नामनिर्देशन दाखल करताना मोहन अग्रवाल, सुदर्शन सोळंके, अमोल सुरुंग, दीपक हिवाळे, श्री. तरवटे तसेच शिवसेनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# समविचारी पक्षाला घेऊन निवडणूक लढविणार-बहादुरभाई

**परळीत महाविकास आघाडीत बिघाडी, कॉंग्रेस ने केला आपला उमेदवार जाहिर**




परळी । प्रतीनिधी

**आगामी नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रीय कॉंग्रेस ने आपली उमेदवारी जाहीर करत महाविकास आघाडीला जोरदार धक्का देत आपली वेगळी चूल मांडली असून समविचारी पक्षाला सोबत घेत निवडणूक लढविणार असल्याचे कॉंग्रेस चे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.**

सय्यद मैमुना बेगम हनीफ उर्फ बहादूर भाई ह्या कॉंग्रेस च्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार असणार असुन शहरातील सर्व १७ प्रभागात समविचारी पक्षाला सोबत घेऊन निवडणूक लढविणार असल्याची घोषणा शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केली आहे. मागील लोकसभा निवडणूक असो कि विधानसभा, सर्व निवडणुकीत कॉंग्रेस वर ज्या जबाबदार्या देण्यात आल्या त्या प्रामाणिक पाणाने पार पाडण्यात आल्या या नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदावर कॉंग्रेस चा अधिकार असतांनाही ईतर पक्षातून प्रवेश केलेल्या उमेदवारास नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशित करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीतील घटक पक्ष करत आहेत असे दिसून आल्याने कॉंग्रेस ने आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे,असेही या पत्रकार परिषदेत बहादुरभाई यांनी सांगितले.सोमवार रोजी साध्या पध्दतीने अर्ज दाखल करण्यात येणार असून या वेळी सर्व समविचारी पक्ष उपस्थित राहणार असल्याचे यावेळी सांगितले.

## पान १ वरून...

### पीएम किसानचे २००० रुपये

शेतकऱ्याला मिळाले आहेत. पीएम किसान योजनेचे दोन हप्ते जारी करण्यामध्ये किमान चार महिन्यांचा कालावधी ठेवला जातो. त्यानुसार २ ऑगस्ट २०२५ ला पीएम किसानच्या २० व्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आली होती. तेव्हा २०५०० कोटी रुपये ९.७ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पाठवण्यात आले होते.

---------

### कॉंग्रेसचा स्वबळाचा नारा

आता वाढले आहे. भाजपने बिहार विधानसभेची निवडणूक मुख्यमंत्री नीतीशकुमार यांच्या नेतृत्वात लढणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार एनडीए म्हणून निवडणूक लढवली गेली. दुसरीकडे महागंठबंधनची निवडणुकीतील निकालाने दाणादाण उडवून दिली. कॉंग्रेसला बोटांवर मोजण्याइतक्याच म्हणजेच ६ जागा मिळवता आल्या. राजदचे तेजस्वी यादव यांना आपला मतदार संघ राखण्यात यश आले पण इतर ठिकाणी मात्र पक्षाला जोरदार झटका बसला. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली आहे. पहिल्या टप्प्यात नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद पंचायती समितासाठी निवडणुका होतील. त्यानंतर सर्वांत महत्वाच्या अशा महापालिका निवडणुकांचा बार उडणार आहे. अशातच महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाने मोठा निर्णय घेतला असून, या निर्णयामुळे महाविकास आघाडीत फूट पडली आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधू या निवडणुकीसाठी एकत्रित येणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. तसे संकेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी त्यांच्या भाषणातून वेळोवेळी दिलेले आहेत. दोन्ही भावांच्या कोणत्या ना कोणत्या कारणाने भेटी झालेल्या आहेत. त्यामुळे ठाकरे बंधू राजकीयदृष्ट्या एकत्र येणार असल्याचे ठरत असतानाच कॉंग्रेसने स्वबळाचा नारा दिल्याने हा निर्णय ठाकरे बंधूंसाठी धक्का असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

-----------

### सत्ताधाऱ्यांनी महिलांना पैसे वाटल्याचा

फडणवीस यांनी बिहार निकालावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या विरोधकांना दिले आहे. सगळ्यांना वेगवेगळ्या योजना करण्याची संधी होती. ज्यावेळी त्यांचे सरकार होते, त्यावेळी त्यांनी त्या केल्या नाहीत. आम्ही योजना केल्या. त्या लोकांना आवडल्या. त्यांनी आम्हाला मतदान केले. त्यावर लोकांना दोष देण्याचे कारण काय? असा सवाल त्यांनी केला. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीवर बोलताना फडणवीस म्हणाले की, विरोधी पक्ष एकत्रित लढतोय की स्वतंत्र लढतोय यापेक्षा मुंबईच्या जनतेचा महायुतीवर विश्वास आहे. जनतेला महायुतीचा महापौर बनविण्याचा निर्णय घेतला आहे.

-------------

### आदिवासींच्या जमीनीसह

राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तक रूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंम् योजना राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान व स्वाभिमानाचे प्रतिक आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली समृद्ध परंपरा जपण्याचे कार्य हा समाज करीत असून त्यांच्या सर्वांगिक विकासाठी संकल्प करण्याचे आवाहन यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

---------

### आधार कार्ड नागरिकत्वाचा नव्हे फक्त

प्रतिबंध करणे हा यामागील उद्देश आहे. या दुरुस्तीच्या आधारे, १७ जून २०२२ पासून फॉर्म ६ मध्ये देखील सुधारणा करण्यात आली आहे. आयोगाने युआयडीएआयच्या २२.०८.२०२३ रोजी कार्यालय आदेशचा संदर्भ देत स्पष्ट केले आहे की, आधार कार्ड हा नागरिकत्व, निवासस्थान किंवा जन्मतारखेचा पुरावा नाही. आधार कायदा २०१६ च्या कलम ९ चा संदर्भ देण्यात आला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, आधार क्रमांक नागरिकत्व किंवा निवासस्थानाचा पुरावा नाही. तसेच या प्रतिज्ञापत्रात मुंबई उच्च न्यायालयाच्या महाराष्ट्र राज्य विरुद्ध (२०२२ चा फौजदारी रिट याचिका क्रमांक ३००२) या खटल्यातील निकालाचा संदर्भ देण्यात आला आहे. यामध्ये म्हटलं होते की, आधार हा जन्मतारखेचा पुरावा म्हणून मानला जाऊ शकत नाही. सरोज विरुद्ध इफ्को टोकियो (२०२४) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने वय निश्चित करण्यासाठी आधारपेक्षा शाळा सोडल्याचा दाखल्यास प्राधान्य दिले होते, असेही निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

------------

### बीडमध्ये अजित दादाच्या

निर्माण होणार आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढे म्हटले की, "मी बीड विधानसभा अध्यक्षपदावर निष्ठेने काम करत होतो. मात्र वेळोवेळी मला पक्षाच्या स्थानिक निर्णयांमध्ये सामावून घेतले जात नव्हते. ही बाब अनेकदा वरिष्ठांच्या निदर्शनास आणूनही दिली. मात्र कोणतीही दखल घेतली गेली नाही." पक्षाने दिलेल्या जबाबदारीतून पक्षाची विचारधारा तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवला. तसेच, "माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल सर्व वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानतो," असेही त्यांनी नमूद केले आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या राजीनाम्यामुळे आगामी स्थानिक राजकारणात कोणते बदल घडतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुकांच्या प्रक्रियेमध्ये विचारात घेतले जात नसल्याच्या नाराजी नंतर त्यांनी राजीनामा दिला मात्र आता निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीची मोठी अडचण निर्माण झाली आहे आणि हा धक्का अजित पवार यांना देखील असल्याने आता बीडमध्ये राजकीय गणित मात्र वेगळे दिसतील.

--------

### थंडीचा कडाका

येथेही ९.५ अंशाची नोंद झाली होती. मोहोळ येथेही ९.५ अंश तापमान होते. त्यामुळे या भागात थंडीचा लाट कायम आहे. कोकणात मात्र कमाल तापमान जास्त आहे. रत्नागिरी येते राज्यातील सर्वाधिक ३४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तर डहाणू येथेही कमाल तापमान ३४ अंशावर होते. कोकणातील इतर भागातही तापमानाचा पारा ३० अंशापेक्षा जास्त होता. राज्याच्या बहुतांशी भागात तापमान २८ ते ३० अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. त्यामुळे राज्यात दुपारी उन्हाचा चटका जाणवत आहे. राज्यात थंडी कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला. उत्तर भारतात तापमानात घसरण नोंदवली जात असून अनेक राज्यांमध्ये थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार १५ नोव्हेंबरपर्यंत उत्तर प्रदेश, बिहार, हरियाना, पंजाब, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांमध्ये थंडीचा जोर वाढणार आहे.

------------

### मराठवाड्यात कॉंग्रेसची

यांचे कधी कार्यकर्त्यांनी बरोबर मिळून मिसळून काम दिसून न आल्याने, या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसला उमेदवार शोधावे लागत असल्याची परिस्थिती आहे. प्रामुख्याने कधीकाळी मराठवाड्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर कॉंग्रेस पक्षाचा पगडा होता. मात्र आता तो राहिलेला दिसत नाही. बीड जिल्ह्यामध्ये कॉंग्रेसचे बडे नेते आहेत. त्यामध्ये सोनिया गांधी यांचे निकटवर्तीय खासदार रजनीताई पाटील, अशोक पाटील मात्र केज वगळता जिल्ह्यात कुठेही कॉंग्रेसचा दबदबा दिसून आला नाही. नांदेडमध्ये अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशानंतर कॉंग्रेसची वाट लागली हे सर्वांना माहीत आहे. असे असताना कार्यकर्त्यांना उभे करण्यासाठी असलेली ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कार्यकर्ता आणि पदाधिकारीच नसल्यामुळे कॉंग्रेसला उमेदवार शोधण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या महाविकास आघाडीतील इतर दोन पक्ष देखील कॉंग्रेसची फारशी दखल घेत नसल्याचे दिसत आहे. अशीच परिस्थिती राहिली तर नेतृत्व दुर्लक्ष करत आहे. या भावनेमधून कार्यकर्ते इतर पक्षात जाऊन उमेदवारी घेतील यात शंका नाही. मात्र असे असेल तर कॉंग्रेस पक्ष तळागाळापर्यंत कधी जाणार आणि कधी उभारणार हा मोठा प्रश्न कॉंग्रेस पक्षश्रेष्ठी समोर आ वासून उभा आहे.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५


## थोडक्यात....



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये क्रांतिकारक बिरसा मुंडा जयंती निमित्ताने अभिवादन

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा जयंती निमित्ताने प्रतिमेस उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रोफेसर डॉ. अशोक लाखे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, डॉ. नितीन कुंभार, प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. अनंथा गाडे, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. गोपाळ सगर, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. प्रताप भानुसे, प्रा. अण्णासाहेब शिंदे यांबरोबर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### शासकीय वसतीगृह गेवराई करीता इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ पुणे अंतर्गत चालविण्यात येणा-या संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुलीचे शासकीय वसतीगृह, गेवराई तालुक्याच्या हद्दीमध्ये १०० विद्यार्थीनींकरीता निवासाची सोय असलेली सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी १०००० स्केअर फुट इमारत, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृहे, शौचालय, संरक्षण भिंत उपलब्ध असणारी इमारत भाडेतत्वावर घ्यावयाची असून अशी इमारत उपलब्ध असल्यास इमारत भाडेतत्वावर देण्याकरीता संबंधित इच्छुक इमारत मालक यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड अथवा मागासवर्गीय मुलीचे शासकीय वसतीगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड या कार्यालयांशी दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा, असे संत भागवानबाबा उसतोड कामगार, मुलींचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षते खाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती संभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न. या बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एफ. एम. शेख व परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव आणि चाइल्ड समन्वयक अश्विनी जगताप यांनी माहे एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ काळात थांबवलेले १५१ बालविवाहची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. बालकल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे सदस्य संतोष वारे,सुरेश राजहंस यांनी त्याच्या कडील बालविवाहाच्या प्रकरणाचा आढावा प्रस्ताविकाव्दारे सादर केला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की ३ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण जिल्हयातील शाळेत स्त्री मुक्ती दिना निमित्त रॅलीचे आयोजन करून जास्तीत जास्त बालिकाचा सहभाग नोंदवणे व बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेणे, गावात झालेल्या बालविवाहचा पाठपुरावा संबधीत ग्रामसेवकांनी करावा आणि तसा अहवाल महिला व बालविकास चाइल्ड लाइन कडे पाठवावा तसेच गट-शिक्षणाधिकारी सी.डी.पी.ओ यांच्या मार्फत पुढील महिन्यात बाल दिन, पथनाट्या, दवंडी, देणे अशा विविध कार्यक्रमाद्वारे बालविवाहाचे दुष्परिणाम या विषयावर कार्यक्रम आयोजित करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या. असे कोणतेही प्रकरण आढळले तर १०९८ या क्रमांक वर संपर्क साधवा.

# नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील -आ.सोळंके

## आ.सोळंके यांनी पत्रकार परिषदेत नगराध्यक्षा पदासाठी आतार मेहरुनबी खलील पटेल यांची उमेदवारी केली जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**नगरपालिकेची रणधुमाळी सुरू असुन अजित पवार राष्ट्रादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवा-या आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत जाहिर करत नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रादीला साथ आणि समर्थन देतील असा विश्वासही आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**



येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि १५ नोव्हेंबर शनिवार रोजी सायंकाळी ४:०० वाजता आयोजित पत्रकार परिषदेत आ. प्रकाश सोळंके यांनी राष्ट्रादीच्या नगराध्यक्षपदासाठी मेहरुनबी खलील पटेल (ना.मा.प्रा.महीला राखीव) यांच्यासह १३ प्रभागातील २६ नगरसेवक पदाच्या उमेदवाऱ्या जाहिर केल्या.दरम्यान यावेळी पालिका ताब्यात असतांना शहरात केलेली स्वच्छता, पाणीपुरवठ्यासह विवीध विकासकामांचा पाढा त्यांनी वाचला. त्याचबरोबर आगामी काळात पालिका ताब्यात आल्यास निश्चीतच भुमिगत नाल्या, आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्न,नाट्यगृह उभारणीसह अनेक विकासकामे पुर्णत्वाकडे घेवुन जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. या पत्रकार परिषदेला सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके,माजी नगराध्यक्ष नासेर खॉ पठाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, खलील पटेल, कल्याण आबुज, डॉ.वसिम मनसबदार,अच्युत लाटे यांची उपस्थिती होती.



या नावांची केली घोषणा

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे ना.मा.प्रा.महिला राखीव उमेदवार निरोनिसा खलील आत्तार पटेल हे तर प्रभाग १ मध्ये रेखा सरोदे,मालती पाठक,प्रभाग २ मध्ये रत्नमाला राकेश साळवे,शेख इम्रान, प्रभाग ३ मध्ये राज सय्यद नूर,पठाण नाजीया जुनेदखान,प्रभाग ४ मध्ये नवनाथ गायकवाड, कलावती फरके, प्रभाग ५ मध्ये मनिषा रेदासनी, राहुल लंगडे, प्रभाग ६ लता लाटे, शेख मजीद, प्रभाग ७ मध्ये वैशाली प्रशांत शेटे,विजय शिंदे, प्रभाग ८ मध्ये यास्मिन तांबोळी, शेख तौफिक, प्रभाग ९ मध्ये मोसिन जलील बागवान, सुनीता प्रल्हाद होके, प्रभाग १० मध्ये राधिका घाडगे,दिनकर होके,प्रभाग ११ मध्ये कोमल वारकड,मतीन शेख,प्रभाग १२ मध्ये उषा बनसोडे, सय्यद रफिक अली, प्रभाग १३ मध्ये सुदामती पोळ, रेहानाबी शेख यांच्या उमेदवाऱ्या जाहीर झाल्या आहेत.

# मुला-मुलींना चांगले संस्कार आणि योग्य दिशा देणे ही आपली जबाबदारी -आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील अरुणा असफअली महिला मंडळ बीड संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड बीड या ठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी भूषवले तर प्रमुख पाहुणे म्हणून आरकडे सर हे उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर शाळेतील शिक्षक जाधव सर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले गर्कळमॅडम, सोनके मॅडम, ढाकणे सर, मुंडे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले तसेच ज्येष्ठ शिक्षक आरकडे सर यांनी यावेळी योग्य अस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.**



शेवटी अध्यक्षीय समारोप प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू बद्दल सर्वच भारतीयांना आदर आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांना लहान लहान मुलं खूप आवडायची या मुलाबरोबर त्यांना गुलाबाची फुले ही आवडत असत म्हणून ते त्यांच्या कोटावर गुलाबाचे फुल लावत असत त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ साली उत्तर प्रदेशमधील प्रयागराज या ठिकाणी झाला. त्यांचा जन्मदिन हा भारतामध्ये बालदिन म्हणून साजरा केला जातो देशांमध्ये धर्मनिरपेक्षतेची भावना रुजवण्याचे कार्य पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले देशाला पुढे नेण्यासाठी शिक्षण विज्ञान आणि विकासाची त्रिसूत्री त्यांनी अमलात आणली या त्रिसूत्रीमुळेच देशांनी वैज्ञानिक प्रगती केली देशातील साक्षरता प्रचंड वाढली आणि विकासात देश अग्रेसर झाला पंडित जवाहरलाल नेहरू हे एक आदर्शवादी आणि वैचारिक प्रतीक होते त्यांचा असा विश्वास होता की जे आपले ध्येय तत्व आणि आदर्श विसरतात त्यांना यश मिळत नाही पंडित जवाहरलाल नेहरू हे असे राजकारणी होते ज्यांनी प्रत्येकाच्या जीवनावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश टाकला आहे एवढेच नाही तर पंडित नेहरूंना समाजवादी धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक चे शिल्पकारही मानले जात होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जाधव सर यांनी अगदी उत्कृष्टपणे केले यानंतर शेवटी शाळेचे शिक्षक मुंडे सर यांनी सर्वांचे आभार मानले व शेवटी शाळेतील बालकांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## कुर्ला येथे महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे ऊस जाळून खाक -आमटे

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील कुर्ला शिवारात महावितरण कंपनीच्या अनागोंदी कारभार कंटाळा आला असून विद्युत तारा तुटल्यामुळे चार शेतकऱ्यांचा आठ एकर ऊस जाळून खाक झाला. या शेतकऱ्यांच्या या शेतकऱ्यांच्या जळीत उसाचा त्वरित पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी दिला.

शेतकरी अतिवृष्टी मधून सावरतो ना सावरतो तोच महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. कुर्ला येथील शेतकरी इम्रान पठाण, इरफान पठाण, अयुब पठाण, गाणी पठाण या शेतकऱ्यांच्या आठ एकर उसाच्या पिकाचे नुकसान झाले आहे. महावितरण कंपनीने शेतकऱ्यांचा ऊस जाळून राख झाला आहे. अद्याप कोणताच पंचनामा केलेला नाही. महावितरण कंपनीने तत्काळ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनाम करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी केली असून प्रश्न मार्गी न लागल्यास शेतकऱ्यांसोबत महावितरण कंपनीच्या कार्यालय समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा ही यावेळी आमटे यांनी दिला.

## पान ६ वरून...

### स्व.डॉ.संपदा मुंडे यांच्या

उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे नगरपंचायत वडवणी,कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी उपसभापती अनिलदादा चोले, भाजपा जिल्हा सरचिटणीस मच्छिंद्र बप्पा झाटे,रूईचे आदर्श सरपंच अॅड.मयूर भैय्या आंधळे, भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्सचे मालक तथा वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत धस,साळींबा गावचे युवा सरपंच दिनेश नाईकवांडे,भाजपा युवा मोर्चाचे युवा नेते धनराज मुंडे,लक्ष्मण बापू मुंडे संरपच चिंचाळा,चिंचवण चे युवा नेते देवानंदजी तांबडे,शिक्षक बंडू नागरगोजे,निवृत्ती अण्णा आंधळे,विष्णू आंधळे सर,धाईतिडक सर,विठ्ठल मुंडे सर, आबासाहेब आंधळे सर, पत्रकार जानकीराम उजगरे, पत्रकार शरीफ भाई

### हरवलेल्या दोन मुलासह

त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पांढरी गावातील सरपंच सुधीर पठाडे व ग्रामस्थांनी श्री गणेश राऊत यांचा सत्कार केला सदर मिसिंग मधील महिलानाव चंद्रकला संदीप सपकाळ व येथे ३० वर्ष व तिची दोन लहान मुले रेवन वय एक वर्ष साई वय दोन वर्ष यांचा शोध बस स्थानक आष्टी येथील सीसीटीव्ही फुटेज चेक करून सदर महिला व त्यांच्या दोन लहान मुलांचा शोध घेतला. सदरील महिला पांढरी गावातील असून तिला पुणे येथे दिले आहे.

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध

ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

### शिवसेना सज्ज; निरीक्षक

लढवा. अठरा-अठरा तास महाराष्ट्र हितासाठी काम करणारे उपमुख्यमंत्री ना. शिंदे साहेब आपल्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभा आहेत. जिथं गरज पडेल तिथे उभं राहून मदत करणारा आणि सर्वसामान्यांचं हीत पाहणारा आपला नेता आहे. बीड नगर पालिकेवर शिवसनेचा भगवा फडकवा शिवसेना तुमच्या पाठीशी आहे असे निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे यांनी सांगितले. बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय या मुलाखत सत्रासाठी इच्छुक उमेदवारांची मोठया प्रमाणात गर्दी झाली होती तर याप्रसंगी शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी व्हिजेएनटीसेना, एसटी कामगार सेनेसह सर्व अधिकृत संघटनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिक उपस्थित होते.

### अर्ज दाखल करण्याच्या

त्यामुळे भाजपाची ताकद आणखी वाढणार आहे. बीड शहरामध्ये भाजपाचे दोन किंवा तीन नगरसेवक निवडून येतात. मात्र योगेश क्षीरसागर हे भाजपासोबत गेले तर त्यांची ताकद मोठ्या प्रमाणात वाढून त्यांच्या नगरसेवक निवडून येण्यामध्ये वाढ होणार आहे. परळी नगरपालिकेमध्ये अशीच परिस्थिती आहे. या ठिकाणी उमेदवार निश्चित नसल्याने अनेकांमध्ये संभ्रम आहे. परळी नगरपालिकेमध्ये धनंजय मुंडे आणि पंकजाताई मुंडे हे एकत्र आले तर ही ताकद मोठी होते. मात्र त्याचेही अद्याप निश्चित नाही .अंबाजोगाई शहरामध्ये मात्र चित्र स्पष्ट आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने राजकिशोर मोदी यांनी प्रचार यंत्रणा सुरू केली आहे. याबरोबरच भाजपाच्या वतीने नंदकिशोर मुंदडा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत अंबाजोगाई मध्ये होईल अशी शक्यता दिसत आहे. गेवराई शहरांमध्ये मात्र पूर्वीपासूनच बाळराजे पवार यांचे वर्चस्व आहे.ही नगरपालिका कायम त्यांच्याकडे जाते. आता माजी मंत्री बदामराव पंडित ही भाजपामध्ये दाखल झाल्याने ही ताकद वाढली असून राष्ट्रवादी कॉंग्रेसला या ठिकाणी शिरकाव करता येईल अशी शक्यता दिसत नाही. धारूर नगरपालिकेमध्ये चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी भाजप आणि राष्ट्रवादी मध्ये तुल्यबळ लढत होईल अशी शक्यता दिसत आहे. या ठिकाणी आता शिवसेनेच्या उमेदवारांने शिरकाव केलेला दिसत असून एकनाथ शिंदे गटाचे गवळी या ठिकाणी तुल्यबळ लढत देतील अशी शक्यता निर्माण झाली आहे. माजलगाव शहरामध्ये आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे वर्चस्व असल्याने त्यांना कोण लढत देणार की सर्वजण एकत्र येऊन लढणार असा संभ्रम आहे. एकूणच सर्वच ठिकाणी उमेदवारी बाबत संभ्रम असून येत्या दोन दिवसात सर्व चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात बालदिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर,बीड येथे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस. ए. या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गदळे आर. ए.आणि ठोकरे एम.व्हि.हे लाभले.



कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाल्यास. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली यात संग्राम जाधव ,अनुश्री गदळे, जाधव अमृता, जिशान बागवान, आरोही शेळके, आदिरा पव्हणे यांनी चाचा नेहरू यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. गदळे सर आणि ठोकरे सर यांनी पंडित नेहरू यांच्या जीवनातील काही महत्वाचे प्रसंग विद्यार्थ्यांना सांगून चाचा नेहरू खरोखरच मुलांचे आवडते का होते,त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याचे बारकाव्याने वर्णन केले. बालदिन साजरा करण्यासाठी विद्यार्थी आज छान रंगबेरंगी कपडे परिधानकरून आले होते,सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती डोंगरे मॅडम यांनी पेन,पेन्सिल,पुस्तके भेट दिली तर बालदिनानिमित्त त्यांना शाळेतर्फे खाऊ वाटप केल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला. या कार्यक्रमाचे अतिशय उत्तम सूत्रसंचलन गदळे अनुष याने केले तर प्रास्ताविक कु. अनुष्का गिरे हिने केले विद्यार्थ्यांचा आवडता बालदिन छानच रंगला शेवटी आभार हाके श्रद्धा हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती. हंगे मॅडम, श्रीमती. पव्हणे मॅडम, मुंडे मॅडम ठोकरे सर आणि तांदळे सर यांनी सहकार्य केले.

## वाघोरा शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळे मध्ये माजी विद्यार्थी संघाची स्थापना दि.१५ नोव्हेंबर शनिवार रोजी मोठ्या आनंद उत्सवामध्ये स्थापना करण्यात आली. सदरील कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांनी शा. व्य.स.अध्यक्ष अरुण बादाडे, उपाध्यक्ष गणेश बादाडे, ग्रामपंचायत सदस्य, नंदकिशोर बादाडे, शाळेचे मुख्याध्यापक बादल डेंगळ यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राठोड एन.आर. यांनी केले. माधव गडापोड यांनी माजी विद्यार्थी संघाची भूमिका, उद्दिष्टे व भावी कार्ययोजना याबाबत उपस्थितांना प्रभावी मार्गदर्शन केले.



माजी विद्यार्थी संघ पदाधिका-यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. अध्यक्ष हर्षद बादाडे, उपाध्यक्ष भरत बादाडे, सचिव बादल डेंगळ, कोषाध्यक्ष श्रीराम बादाडे,सदस्य वाजिद अहमद, राजेभाऊ गोरे,सल्लागार प्रवीण बादाडे,रामेश्वर बादाडे, सेवानिवृत्त शिक्षक प्रतिनिधी त्र्यंबक बादाडे,निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार अभिनंदन करण्यात आले.सर्व नव्याने निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकदिलाने, निष्ठापूर्वक कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमासाठी आकर्षक सुंदर फलक लेखन व छायाचित्रण केशव बादाडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, यशस्वीतेसाठी बबन कपाटे, निदेशक केशव बादाडे,अमर वावळकर, रवींद्र सावंत यांनी कार्य केले. सूत्रसंचालन गणेश झाटे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे एस.पी. राठोड यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धरती आबा बिरसा मुंडांनीच स्वातंत्र्यलढ्याची ज्योत पेटवली -वनवे

## आदिवासी विद्यार्थ्यांनी पुस्तकाला मित्र बनवावे -शिवाजी गांधले

वडवणी । प्रतिनिधी

आज १५ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारतभर धरती आबा आदिवासी आद्य क्रांतिकारक ''बिरसा मुंडा '' यांची १५० वी जयंती आदिवासी जनजाती गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात येत आहे.आदिवासी विकास विभाग, प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता.धारूर जि.बीड या शाळेमध्ये छत्रपती संभाजी नगर प्रकल्पाच्या प्रकल्पाध्यक्ष श्रीमती चेतना मोरे मॅडम व इतर सर्व अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तर शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये गेल्या अनेक दिवसापासून धरती आबा बिरसा मुंडा यांच्या दीडशव्या जयंतीनिमित्त ''जनजाती गौरव दिनानिमित्त'' गायन स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,वेशभूषा स्पर्धा,नृत्य स्पर्धा, रांगोळी,नाटक,भाषण अशा विविध स्पर्धेचे आयोजन शाळेमध्ये केले होते.आज प्रथम आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.धरती आबा बिरसा मुंडा यांनी केलेल्या कार्य याविषयी शाळेतील विद्यार्थी रोहिदास वाकतकर,वेदिका कोकाटे,शिवानी पांढरे,कुश मुकाडे अशा अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.श्यामबाला वाकतकर व रेखा अंभोरे या विद्यार्थिनी बिरसा मुंडा यांच्या वरील गीत सादर करून कार्यक्रमाचे वातावरण प्रसन्न करून टाकले.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी पारंपारिक वेशभूषा करून,आदिवासी नृत्य सादर करत सर्व प्रेक्षकांची,विद्यार्थी,शिक्षक गुरुजन वर्गांची मनी जिंकून घेतली. त्याच दरम्यान मंचावर अवतरलेले विद्यार्थी रुपी ''बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे''यांची हुबेहूब वेशभूषा साकारलेले विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.तर अंधश्रद्धा यावर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारच नाटक सादर करून,आपल्या कलेतून सर्व उपस्थित त्यांना खळखळून हसवत. नाट्यकलेच्या माध्यमातून शिक्षणा अभावी ''आदिवासी समाजामध्ये असलेले अंधश्रद्धा''यावर प्रकाश टाकून शिक्षणाकडे चला असा संदेश बाल कलाकारांनी दिला.तसेच विविध स्पर्धेतील बक्षिसाचे





वितरण मंचावरील मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.या दरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेतील शिक्षक श्री शिवाजी गांधले सरांनी विद्यार्थ्यांनी पुस्तकाशी मैत्री करावी असा संदेश त्यांनी दिला.तर क्रांतिकारक बिरसा मुंडा व इतर आदिवासी क्रांतिकारक यांच्या विषयी सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक श्री गोरक्षनाथ आबुज सरांनी सांगितली.अध्यक्ष भाषणामधून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शाळेचे मुख्याध्यापक श्री. सखाराम वनवे सर यांनी सांगितले की,आपल्या देशावर असलेली इंग्रजांची सत्ता.या सत्तेला उलथून टाकण्यासाठी धरती आबा आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांनीच प्रथमता स्वातंत्र्य लढ्याची ज्योत! पेटवण्याचे काम आद्य क्रांतिकारक धरती आबा बिरसा मुंडा या क्रांतिकारकांनी केले. इंग्रजांच्या गुलामगिरी विरुद्ध बंड पुकारले आणि आपल्या आदिवासी समाजाला.सर्व सवंगड्यांना सोबत घेत इंग्रजांविरुद्ध उलगुलांचा नारा देत.इथली जल, जमीन,जंगल यावर आमचा हक्क आहे असे सांगत परकीय सत्याविरुद्ध दंड थोपटले. त्यावेळची परिस्थिती नुसार आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांनी असे महान कार्य केले.परंतु सध्याच्या परिस्थितीमध्ये आदिवासी समाजाने आणि आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाअभावी असलेल्या परिस्थिती.तसेच समाजामध्ये असलेली अंधश्रद्धा या विरुद्ध शिक्षणाच्या माध्यमातून उलगुलांचा नारा देत.विकासाच्या मार्गावर इतर समाजाच्या बरोबर यावे असा संदेश दिला.या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील शिक्षक

श्री.परमेश्वर तावसे,श्री.नागनाथ चात्रे,श्री.जी.बी आबुज,श्री.व्ही व्ही कुलकर्णी,श्री शिवाजी गांधले,श्री.संभाजी मुसळे,श्रीमती.सारिका डोंगरे,श्रीमती गायकवाड मॅडम श्रीमती. पुनम लांब, मुकाडे मॅडम ,श्री.बी व्ही बडे,श्री.हनुमान केंद्रे यांच्यासह शिक्षक इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.बी व्ही बडे सर तर आभार प्रदर्शन श्री संभाजी मुसळे सर यांनी केले.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी फडणवीस सरकारची मोठी घोषणा

राज्यातील पूरग्रस्त शेतर्कयांसाठी काहीशी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त शेतर्कयांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यात अतिवृष्टीमुळे बाधित शेतर्कयांच्या खरडलेल्या शेतजमिनीसाठी मोफत माती, गाळ, मुरूम आणि कंकर दिला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. जमीनीच्या सुपीकतेसाठी महसूल मंत्र्यांनी हा मोठा निर्णय घेतलाय. पूरग्रस्त जमीनीसाठी गौण खनिजे इत्यांदींवर रॉयल्टी माफ करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. त्यामुळे अतिवृष्टी बाधित पूरग्रस्त

शेतकऱ्यांना आपण जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणतो. पण सध्या राज्यातील शेतकरी संकटात सापडलाय. अतिवृष्टी आणि पुरामुळं शेतकऱ्यांच्या घराचं, पिकांचं आणि त्याचबरोबर जमिनींचं मोठं नुकसान झालंय. सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीला सप्टेंबर महिन्यात महापूर आला होता. या पुरात शेतकऱ्यांची पिकं तर वाहून गेलीच, पण जमिनी देखील वाहून गेल्या आहेत. जमिनीला १० ते



१५ फुटाचे खड्डे पडलेत. नदीने पाण्याचा प्रवाहच बदलल्यानं सगळं होत्याचं नव्हतं झालं आहे. अशीच काहीशी परिस्थिती उर्वरित महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी बघायला मिळाली आहे. दरम्यान, या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मायेचा आधार देण्यासाठी आता राज्य सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे. सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत.राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## केळीच्या पावडरमधून शेतकऱ्यांना दुप्पट फायदा : याप्रकारे करा प्रक्रिया



शेतकरी केळीच्या बागेतून जास्तीत जास्त उत्पन्न काढत आहेत मात्र शेतकऱ्यांना फक्त केळी फळा मधूनच नाही तर असे अनेक पर्याय आहेत ज्यामधून शेतकरी जास्तीत जास्त उत्पन्न काढू शकतो. केळी पासून पावडर तयार करून सुद्धा ते उत्पन्न दुप्पट करू शकतात. केळीची पावडर तयार करण्यासाठी त्यास कच्चा केळीची गरज असते. केळीपासून जी पावडर तयार होते त्या पावडरला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

अशा प्रकारे करा पावडर : सर्वात प्रथम तुम्ही हिरवी केळी ला १० ग्रॅम सोडियम हायपोक्लोराइट द्रावण देणे गरजेचे आहे. सोबतच १ ग्रॅम सायट्रिक ॲसिड १ लिटर पाण्यात ५ मिनिट बुडवावे जे की आवश्यक आहे. वरील प्रक्रिया झाल्यानंतर केळी चे ४ मिमी तुकडे करावे व नंतर ते तुकडे जे द्रावण केले आहे त्यामध्ये बुडवावेत ज्यामुळे एंजाइमॅटिक ब्राउनिंग होणार नाही. यानंतर केळीचे जे काप आहेत ते काप ६० डिग्री सेल्सिअस पर्यंत कोरडे होण्यासाठी २४ तासासाठी ओव्हनमध्ये ठेवावे. जो पर्यंत केळीचे तुकडे पूर्णपणे कोरडे होत नाहीत तो पर्यंत तुम्हास जास्त काळजी घ्यावी लागणार आहे. केळीचे काप हळूहळू ब्लेंडर आणि मिक्सरमध्ये बारीक करून घ्यावेत जे की पूर्ण बारीक पावडर होईपर्यंत त्याची प्रक्रिया करावी. जर केळी पिवळ्या रंगाची असेल तर त्याचा सुगंध असेल. जी तयार झालेली पावडर आहे ती पॉलिथिलीनच्या पिशव्या तसेच शिशाच्या बाटल्यांमध्ये पॅक करून २० - २५ अंश सेल्सिअस तापमानात ठेवावेत. असे केल्याने केळीची पावडर तयार होईल.

या पावडर ला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे जे की शेतकऱ्यांना या पावडर पासून दुप्पट उत्पन्न निघेल. मधुमेह तसेच हृदयरोग, त्वचेसाठी उपयुक्त, पचनशक्ती मजबूत करणे, वजन कमी करणे आणि वाढवणे यासाठी केळीची पावडर खूप फायद्याची आहे. एकदा की शेतमालाची आयात सुरू झाली की तुम्ही कंपन्यांची नोंदणी करून तुमची पावडर योग्य प्रकारे विकू शकता. रोज १ किलो ची जरी तुम्हास ऑर्डर आली तरी रोज कमीतकमी ७ किलो पावडर विकू शकता.

## रब्बी भुईमूग लागवड तंत्रज्ञान

भुईमूग उत्पादन वाढीसाठी गादी वाफ्याचा वापर करून त्यावर प्लास्टिक आच्छादन तंत्राचा वापर करावा. कोकण विभागात भुईमूगाची उशिरा रब्बी लागवड १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबरच्या दरम्यान करावी. भुईमूग लागवड करताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात याविषयी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने दिलेली माहिती महत्वाची ठरते.

रब्बी भुईमुगाची लागवड पारदर्शक प्लास्टिक आच्छादन पाच ते सहा मायक्रॉन पद्धतीने करण्यासाठी जमीन वाफसा स्थितीत आल्यावर जमिनीची नांगरट करून जमिन समपातळीत आणावी. त्यानंतर प्रतिगुंठा १०० ते १५० किलो चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये मिसळावे. ५ ते ७ सेंमी उंचीचे व ६० सेंमी रुंदीचे आच्छादनासाठी गादीवाफे तयार करावेत. दोन गादीवाफ्यांमधील अंतर ३० सेंमी ठेवावे. ठिबक सिंचन वापरावयाचे असल्यास आच्छादन अंथरण्यापूर्वी ठिबक सिंचनाचा संच वाफ्यावर पसरून घ्यावा.

प्रतिगुंठा १ किलो युरिया, ६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १ किलो म्युरेट ऑफ पोटॅश खताची मात्रा मातीमध्ये मिसळून द्यावी. आच्छादन अंथरण्यापूर्वी तणांच्या नियंत्रणासाठी ओल्या पृष्ठभागावर ब्युटाक्लोर तणनाशक ५० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पेरणीपूर्वी पावसाची उघडीप असताना एकसारखी फवारणी करावी.

तणनाशक फवारणीनंतर प्लास्टिक आच्छादन गादी वाफ्यावर अंथरावे व कडांवर मातीचा थर द्यावा. आच्छादनाच्या मध्यभागी आणि २० सेंमी अंतर ठेवून दोन्ही बाजूला अशा एकूण ३ ओळींमध्ये ३ सेंमी व्यासाची रुंदीच्या दिशेने सरळ रेषेत छिद्र पाडावीत आणि त्यानंतर लांबीच्या दिशेने १० सेमी अंतरावर सरळ रेषेत ३ सेंमी व्यासाची छिद्रे पाडावीत.

कोकणात लागवडीसाठी सुधारित उपट्या जातींचा वापर करावा. लागवडीसाठी कोकण गौरव, ट्रॉम्बे कोकण टपोरा, टी.ए.जी.२४, कोकण भूरत्न, टी.जी.२६, टी.जी.३७ ए, टी.पी.जी.४१ या जातींची निवड करावी. अच्छादनावर पाडलेल्या छिद्रात ३ ते ४ सेंमी खोलीवर बियाण्याची पेरणी करावी. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी बियाण्याला ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात चोळावे. यानंतर २० ग्रॅम रायझोबीयम आणि ५० ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू संवर्धकाची प्रति किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. पेरणीनंतर हलके पाणी द्यावे.



## गाय आणि म्हशीच्या चाऱ्यात लाल शेवाळ मिसळल्यास दूध उत्पादन दुप्पट वाढते

गेल्या काही दिवसांमध्ये शेतकऱ्यांचा वांग्याच्या लागवडीकडे ओढा वाढला आहे. गुणवत्तापूर्ण वांग्याला हॉटेल, मॉल, तसेच दैनंदिन आठवडे बाजारात मोठी मागणी देखील असते. विशेष म्हणजे वांग्याचे पीक हे बारमाही घेतले जाणारे पीक आहे. अशातच आता अवघ्या काही दिवसांमध्ये खरीप हंगाम सुरु होणार असून, वांग्याच्या रोपांसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु झाली आहे.

बियाणे आणि खते : शेतकऱ्यांना वांग्याच्या लागवडीसाठी अधिकृतपणे बियाणे खरेदी करायचे असल्यास शेतकरी राष्ट्रीय बियाणे महामंडळाच्या (एनएससी) संकेतस्थळावरून थेट बियाणे मागवू शकतात. एनएससीच्या संकेतस्थळावर शेतकरी सर्व प्रकारच्या फळे आणि भाजीपाल्याचे बियाणे थेट घरपोच मागवू शकतात. याच पार्श्वभूमीवर आपण वांग्याच्या ९९२२ प्रजाती, पूसा हिरवी प्रजाती आणि कुकू प्रजाती या तीन प्रजातीच्या वांग्याची वैशिष्ट्ये आहेत.



९९२२ प्रजाती : ९९२२ ही वांग्याची हायब्रीड प्रजाती असून, तिचा रंग काळसर आकार गोल किंवा आयताकार असतो. या वांग्याची लांबी जवळपास ८ ते १० सेमी इतकी असते. वांग्याचे हे वाण खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात लागवड केले जाऊ शकते. या वाणाची लागवड ही देशातील सर्वच राज्यांमध्ये केली जाऊ शकते. एनएससीने ९९२२ प्रजातीच्या वांग्याचे १० ग्रॅम बियाण्याचे पॅकेट हे ४२ रुपये इतक्या नाममात्र किमतीत उपलब्ध करून दिले आहे.

पुसा हिरवी वांगी : पुसाच्या हिरव्या प्रजातीचे वांगे हे आकारात गोल असते. या वांग्याची लागवड मैदानी भागात केली जाते. या वाणाचे वांग्याचे पीक किमान ५५ ते ६० दिवसांमध्ये तोडणीला येते.

पुसाच्या हिरव्या प्रजातीचे वांग्याचे २५ ग्रॅम बियाण्याचे पॅकेट, शेतकऱ्यांना एनएससीने केवळ २० रुपये इतक्या नाममात्र दरात उपलब्ध करून दिले आहे.कुकू प्रजाती : वांग्याची कुकू प्रजाती ही खरीप हंगामासाठी वापरली जाणारी विशेष प्रजाती आहे. या प्रजातीचे वांगे १०० ते ११० दिवसांत तोडणीला येते. या वाणाच्या लागवडीपासून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ३०० क्विंटल उत्पादन मिळते. कुकू प्रजातीचे १० ग्रॅम बियाणे हे एनएससीच्या संकेतस्थळावर, शेतकऱ्यांसाठी केवळ ४६ रुपयांना उपलब्ध आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

- १८२१ : कनाडा या देशात नागरिकता कायदा आणखी कडक करण्यात आला होता.
- १८२१ : मेक्सिको या देशाला स्वतंत्र देश म्हणून मान्यता मिळाली होती.
- १८६८ : लॅकियर आणि नान्सेन या शास्त्रज्ञांनी खग्रास सूर्यग्रहणाचा अभ्यास करून हेलियमचा शोध लावला. ग्रीक सूर्यदेवता 'हेलिऑस' वरुन त्या वायूला हे नाव देण्यात आले आहे.
- १८७० : ओकलाहोमा आजच्याच दिवशी अमेरिकेचे ४६ वे प्रांत बनले होते.
- १८९३ : डॉ. ॲनी बेझंट यांचे भारतात आगमन
- १९०७ : ओक्लाहोमा हे अमेरिकेचे ४६ वे राज्य बनले.
- १९१४ : अमेरिकेतील मध्यवर्ती बँक 'फेडरल रिझर्व्ह' सुरू झाली.
- १९१५ : लाहोर कटातील आरोपी विष्णू गणेश पिंगळे, बागी कर्तार सिंग यांच्यासह ७ जणांना फाशी देण्यात आली.
- १९३० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरीत स्पृश्यास्पृश्यांचे पहिले प्रकट सहभोजन केले.
- १९४५ : युनेस्को ची स्थापना झाली.
- १९६५ : वाल्ट डिस्नी वर्ल्ड ची पहिल्यांदा सार्वजनिक रित्या घोषणा करण्यात आली होती.
- १९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाने ऑस्ट्रेलिया या देशापासून स्वातंत्र्य मिळविले होते.
- १९८८ : अकरा वर्षांनंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुका जिंकुन बेनझीर भुट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान बनल्या.
- १९९५ : भारतीय वंशाचे वासुदेव पांडे त्रिनिनाद व टोबैगो या देशाचे आजच्याच दिवशी पंतप्रधान बनले होते.
- १९९६ : 'चतुरंग प्रतिष्ठान'च्या 'पर्सन ऑफ प्राईड' पुरस्कारासाठी मुख्य निवडणुक आयुक्त टी. एन. शेषन यांची निवड
- १९९६ : कोकण रेल्वेच्या रत्नागिरी मुंबई मार्गाचा शुभारंभ
- १९९७ : अनिवासी भारतीय उद्योजक स्वराज पॉल यांना ब्रिटनमधील ब्रॅडफोर्ड विद्यापीठाकडून सन्माननीय डॉक्टरेट प्रदान.
- २००० : कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे दिला जाणारा 'संस्कृत रचना पुरस्कार' डॉ. गजानन बाळकृष्ण पळसुले यांना जाहीर
- २००६ : पाकिस्तान ने मध्यम अंतराच्या गोरी- व्ही क्षेपणास्त्राचे यशस्वी परीक्षण केले होते.
- २००७ : भीषण चक्रीवादळ 'सीडर' ने बंगालच्या खाडीतून उगम पावून बांगलादेशात भीषण अतोनात नुकसान केले होते.
- २०१३ : २४ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीनंतर महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याची क्रिकेटमधून निवृती व त्यानंतर काही तासातच त्यास 'भारतरत्न' हा भारतातील सर्वोच्च नागरी किताब जाहीर झाला. त्याला हा सन्मान सर्वात लहान वयात (४०) मिळाला.
- २०१४ : इस्लामिक स्टेट या आतंकवादी संघटनेने सिरीया येथील कुर्दिश योद्ध्यांच्या विरुध्द युद्धास सुरुवात केली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १७४२ : रोमन सम्राट तिबेरीयस यांचा जन्म. (मृत्यू: १६ मार्च ३७)
- १८३६ : डेविड कालाकौआ - हवाईचा राजा (मृत्यू: २० जानेवारी १८९१)
- १८४६ : उर्दूचे प्रसिध्द शायर अकबर इलाहाबादी यांचा जन्म झाला होता.
- १८८० : ब्रिटीश लेखक, कवी तसेच नाटककार अल्फ्रेड नॉयस यांचा जन्म झाला होता.
- १८९४ : 'काव्यविहारी' धोंडो वासुदेव गद्रे - केशवसुत संप्रदायी आधुनिक कवी (मृत्यू: २२ जानेवारी १९७५)
- १८९७ : भारतीय-पाकिस्तानी शैक्षणिक चौधरी रहमत अली यांचा जन्म. (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९५१)
- १९०४ : नायजेरिया देशाचे पहिले अध्यक्ष ननामदी अझीकीवे यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे १९९६)
- १९०९ : भारतीय-पाकिस्तानी धर्मगुरु मिर्झा नासीर अहमद यांचा जन्म. (मृत्यू: ९ जून १९८२)
- १९१७ : चित्रगुप्त श्रीवास्तव ऊर्फ 'चित्रगुप्त' - संगीतकार (मृत्यू: १९९१)
- १९२० : अमेरिका येथील प्रसिध्द व्यंगचित्रकार सैनमन यांचा जन्म झाला होता.
- १९२२ : पोर्तुगाल येथील प्रसिध्द नोबेल पुरस्कार विजेते लेखक जोसे सरामैगो यांचा जन्म झाला होता.
- १९२२ : विएतनाम या देशाचे राजनेते व प्रसिध्द राजनीतिज्ञ होंग मिन्ह चिन्ह यांचा जन्म झाला होता.
- १९२७ : डॉ. श्रीराम लागू - 'नटसम्राट', 'हिमालयाची सावली', 'किरवंत' क्षितीजापासून समुद्र' इ. अनेक नाटकांतील प्रभावी चरित्र भूमिकांनी दोन दशके रंगभूमी गाजवणारे कलावंत, मराठी व हिन्दी चित्रपटांतील कलाकार
- १९२८ : डॉ. निर्मलकुमार फडकुले - मराठी संत साहित्यातील विद्वान (मृत्यू: २९ जुलै २००६)
- १९३० : मिहिर सेन - इंग्लिश खाडी पोहुन जाणारे पहिले भारतीय (मृत्यू: ११ जून १९९७)
- १९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर रामचंद्र राव यांचा जन्म झाला होता.
- १९६३ : मिनाक्षी शेषाद्री - अभिनेत्री
- १९६८ : भारतीय राजकारणी शोभाजी रेगी यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल २०१४)
- १९७३ : पुल्लेला गोपीचंद - बॅडमिंटनपटू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८५७ : पासी जातीची वीरांगना उदा देवी यांचा मृत्यू झाला होता.
- १९१५ : गदर पार्टीचे सदस्य आणि लाहोर कटातील क्रांतिकारक विष्णू गणेश पिंगळे यांच्यासह ७ जणांना फाशी देण्यात आले. (जन्म: १८८८ तळेगाव ढमढेरे, पुणे)
- १९४७ : व्हेनिस फिल्म फेस्टिवलचे संस्थापक ज्युसेप्पे वोल्पी यांचे निधन. (जन्म: १९ नोव्हेंबर १८७७)
- १९५० : डॉ. बॉब स्मिथ - 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस'चे एक संस्थापक (जन्म: ८ ऑगस्ट १८७९)
- १९६० : क्लार्क गेबल - अमेरिकन अभिनेता (१ फेब्रुवारी १९०१)
- १९६७ : रोशनलाल नागरथ ऊर्फ 'रोशन' - संगीतकार (जन्म: १४ जुलै १९१७)
- २००६ : मिल्टन फ्रीडमन - नोबेल पारितोषिकविजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: ३१ जुलै १९१२).
- २०१५ : प्रसिध्द हिंदी चित्रपट अभिनेते सईद जाफरी यांचे निधन



रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# बालविवाहमुक्त जिल्हा होण्यासाठी १३२७ गावांच्या विशेष ग्रामसभेत जनजागृती- भंडारी



अहिल्यानगर । प्रतिनिधी

बालपण हे जीवनातील सोनेरी क्षण असतात. जीवनात मागे पाहताना बालपण आठवते. मात्र सध्या बालपणातच विवाह होत असल्याने त्याच्या गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत आहे. बालविवाहमुक्त जिल्हा होण्यासाठी १३२७ गावांच्या ग्रामसभेत या विषयावर जागृती करण्यात आली. तसेच बाल अत्याचार मुक्त जिल्हा होण्यासाठी प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहणार आहे. बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुलांसह पालकांमध्ये जागृती आवश्यक आहे. मुलांना स्वसंरक्षणाचे धडे दिल्यास ते आपले संरक्षण अधिक चांगल्या पध्दतीने करु शकतील, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

स्नेहालय संचलित उडान प्रकल्प, मराठी पत्रकार परिषद, जिल्हा परिषद जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंती निमित्त लालटाकी येथील त्यांच्या पुतळ्यास्थळी लहान मुलांसह बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बाल अत्याचार मुक्त अभियानाला सुरुवात प्रारंभ करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी जिल्हा महिला बालविकास अधिकारी संजय कदम, पोलिस उपाधीक्षक दिलीप टिपरसे, भरोसा सेलच्या पोलिस उपनिरीक्षक प्रियंका आठरे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, प्रभारी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड, नागोरी मुस्लिम मिसगर जमात स्टचे अध्यक्ष रेहान काझी, उडान प्रकल्पाच्या मानद सचिव ॲड. बागेश्री जरंडीकर, स्नेहालयाचे संचालक हनिफ शेख, चाइल्ड लाइनचे महेश सूर्यवंशी, डॉ. अंशु मुळे व एम्स इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात हनीफ शेख म्हणाले, बालकांवरील अन्याय, अत्याचार रोखण्यासाठी व बालकांच्या हक्कांची जपणूक करण्याचे कार्य उडान प्रकल्प करीत आहे.पोलिस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांनी विश्वास संपादन केलेले जवळच्या व्यक्तींनी बालकांवर अत्याचार केल्याचे अनेक घटनांमधून समोर आले आहे. यासाठी मुलांना चांगला व वाईट स्पर्श याची माहिती देणे आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या. सूत्रसंचालन रुपेश पासपुल यांनी, तर आभार ॲड. बागेश्री जरंडीकर यांनी मानले. आकाशात फुगे सोडून बालदिन साजरा करण्यात आला. देश की ताकत हम सब बच्चे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. परिसरात तिरंगे ध्वज, रांगोळी व फुग्यांची सजावट करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी भारत माता की जय देश की ताकत हम सब बच्चे..., जोडो जोडो भारत जोडो... च्या घोषणा देत पाहुण्यांच्या हस्ते आकाशात फुगे व पांढरे कबुतरे सोडण्यात आली. तर जिल्हा बाल अत्याचार मुक्त करण्यासाठी योगदान देण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

## बेशिस्त चालकांवर कॅमेऱ्याची नजर;चौथे ट्रॅफिक इंटरसेप्टर वाहन धाराशिवकरांच्या सेवेत



धाराशिव । प्रतिनिधी

वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी व अपघातावर नियंत्रण आणण्याकरिता जिल्हा वाहतूक शाखा आता इंटरसेप्टर वाहनांचा वापर करणार आहे. या वाहनाच्या माध्यमातून नियम मोडणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले जाणार आहे. धाराशिवच्या वाहतूक शाखेत गुरुवारी नवीन वाहन दाखल झाले आहे.

जिल्ह्यात मागील काही वर्षापासून वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वाहतुकीला शिस्त लागावी म्हणून वाहतूक शाखेत आधुनिक इंटरसेप्टर वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. या वाहनामुळे नियमभंग, वेगमर्यादा उल्लंघन, तसेच धोकादायक वाहनचालकांवर कारवाई करणे आता शक्य होणार आहे. वाहनाच्या सहाय्याने सील्ट बेल्ट न वापरणे, मोबाइलवर बोलत वाहन चालविणे, काळ्या काचांचा कारला वापर करणे, हेल्मेट न वापरणे आदींवर नजर ठेवली जाणार आहे, असे वाहतूक शाखेने सांगितले. प्रकार - दंड ट्रिप्पल सीट प्रवास १००० हेल्मेट न वापरणे १००० वेग मर्यादा २००० रॅश ड्रायव्हिंग १००० ब्लॅक फिल्म बसवणे ५०० (दुसऱ्यांवेळी १५००) मोबाइलचा वापर १००० (दुसऱ्यांवेळी १००००) सील बेल्ट न लावणे ५०० (दुसऱ्यावेळी १५००) इंटरसेप्टर वाहन नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच या वाहनांमुळे वाहनधारक वेग मर्यादांचे पालन करुन वाहने चालवतील. त्यामुळे अपघाताच्या घटनाही कमी होण्यास मदत होईल. राष्ट्रीय महामार्गावर जिल्ह्यात या वाहनाच्या माध्यमातून कारवाया केल्या जाणार आहेत. - अरविंद हिंगोले, सहायक पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, धाराशिव वाहनाच्या माध्यमातून कारवाया कशा करावयाच्या याबाबत तीन कर्मचाऱ्यांना पुणे येथे प्रशिक्षण मिळाले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांना लवकरच प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे या वाहनच्या माध्यमातून कारवायाही आता सुरु होणार आहेत.

# आपेगावातील श्रीक्षेत्रात माऊलीच्या मूर्तीवर पहिल्या दिवशी सूर्य दर्शन

पैठण । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी असलेल्या पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र आपेगाव येथे माऊलीचा संजीवन समाधी सोहळा सुरु झाला आहे. या सोहळ्यादरम्यान तीन दिवसांच्या सुर्य दर्शन प्रसंगी माऊलीच्या मुर्तीवर किरणोत्सव पाहायला मिळाल्यामुळे वारकरी व भाविकांनी माऊली गजर केला. पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात गेल्या चार वर्षांपासून माऊलीच्या मुर्तीवर समाधी सोहळ्यात सूर्यकिरणे मंदिरात प्रवेश करतात. हा किरणोत्सव तीन दिवस दुपारी १२:४५ ते १२:५२ या वेळेत सुरु होतो, जेव्हा किरणे संत ज्ञानेश्वरांच्या मूर्तीला उजवीकडून डावीकडे जात मुखकमलाला स्पर्श करतात. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी किरणे चेहऱ्यावर येऊन किरणोत्सव पूर्ण होतो. यंदा हा किरणोत्सव पहिल्या दिवशीच पाहायला मिळाला आहे.



ज्ञानेश्वर मंदिर संस्थानाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर आपेगाव यांनी सांगितले की पहिल्या दिवशी सूर्यकिरणे मुर्तीवर मुखकमलावर पडल्या आहेत. हा सोहळा अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी व भाविक जमले आहेत. संस्थानाकडून गर्दीचे योग्य नियोजन केले असल्यामुळे किरणोत्सवाचा सोहळा सर्व भाविकांना पाहता येत आहे. गेल्या पाच वर्षांपूर्वी ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी असलेल्या मंदिरातील माऊलीच्या मुर्तीवर ढगाळ वातावरण असूनही ठरलेल्या वेळेत सूर्य दर्शन झाले होते आणि महाराष्ट्रातील असंख्य वारकरी भाविकांनी किरणोत्सवाचा अद्भुत अनुभव घेतला होता. याही वर्षी ढगाळ वातावरणामुळे किरणोत्सव होईल की नाही ही शंका भाविकांच्या मनात होती, परंतु माऊली भक्तांना सुर्य दर्शन झाले आहे. हा किरणोत्सव पाहण्यासाठी आपेगाव येथे मोठी गर्दी एकवटली आहे.

## राज्यात कुष्ठ रोग निर्मुलनासाठी सोमवारपासून आरोग्य तपासणी मोहिम

### ८.६६ कोटी जनतेच्या घरोघरी जाऊन घेतली जाणार माहिती–मंत्री प्रकाश आबिटकर

हिंगोली । प्रतिनिधी

राज्यात कुष्ठ रुग्णांचे लवकरात लवकर निदान करून त्यांना त्वरीत औषधोपचार सुरु करून पूर्ण मात्रा देत कुष्ठरोग निर्मूलनासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सोमवारपासून ता. १७ राज्यातील ८.६६ लाख जनतेची आरोग्य विषयक तपासणी केली जाणार असल्याची माहिती राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे. राज्यात कुष्ठरोग निर्मुलन मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत राज्यात आरोग्य कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून त्यांच्या मार्फत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. त्यातून संशयित कुष्ठ रुग्णांची माहिती घेतली जाईल. त्यांच्या निदान निश्चितीनंतर तत्काळ औषधोपचार सुरु करणे अत्यंत महत्वाचे आहे. कुष्ठ रुग्ण निदान व औषधोपचारांपासून वंचित राहिल्यास अथवा विलंब झाल्यास रुग्णाला या रोगांपासून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीचा सामना तर करावा लागतोच आणि त्याच्या सहवासातील इतर निरोगी लोकांना रोगाची लागण होण्याचा धोका संभवतो.



त्यामुळे सर्व कुष्ठ रुग्ण शोधण्यासाठी सोमवारपासून ता. १७ ते ता. २ डिसेंबर या कालावधीत विशेष अभियान राबवले जाणार आहे. त्यासाठी आरोग्य व इतर विभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये कुष्ठ रुग्णांचे संशयित शोधून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून निदान निश्चिती नंतर तात्काळ उपचार सुरु करण्यात येणार आहेत. या कालावधीत राज्यातील सुमारे ८.६६ कोटी लोकसंख्येची घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हिंगोली जिल्ह्यांमध्ये ११३५ पथकामार्फत ११.२३ लाख लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांमध्ये आरोग्य कर्मचारी, आशा व पुरुष स्वयंसेवक हे घरोघरी जावून संशयित कुष्ठ रुग्ण शोधणार आहेत. संशयित कुष्ठ रुग्णांना निदान निश्चितीसाठी आरोग्य संस्थेमध्ये पाठवणार आहेत. कुष्ठरोगाचे निदान झालेल्या कुष्ठ रुग्णांवर तातडीने मोफत औषधोपचार सुरु करण्यात येणार आहे.

## उर्दू शाळेतून शालेय पोषण आहार चोरी करणारा जेरबंद



शिवणा

शिवना येथील प्राथमिक उर्दू शाळेतून शालेय पोषण आहारातील तांदूळ, तेल चोरी करणाऱ्यास अजिंठा पोलिसांनी अटक केली. ३ ते ४ नोव्हेंबरदरम्यान शाळेतून हा माल चोरीला गेला होता. मुख्याध्यापक शेख राजिक शेख सादिक यांनी अजिंठा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शेख अनिस शेख यासिन (रा. यशवंतनगर, सिल्लोड) याला अटक केली. त्याच्याकडून ७५० किलो तांदूळ, ८८ किलो तेल, ८५ किलो मसूर डाळ असा एकूण २६,६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरीसाठी वापरलेली ॲपेरिक्षाही (एमएच २० ईके ३७८४) जप्त करण्यात आली. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक अमोल ढाकणे, पीएसआय धम्मदीप काकडे, पोहेकॉ भागवत शेळके आदींनी केली.

## वीर लहुजी वस्ताद साळवे अन्यायाविरुद्ध लढणारे पहिले समाजसुधारक– जगताप

अहिल्यानगर

वीर लहुजी वस्ताद साळवे हे अन्यायाविरुद्ध लढणारे पहिले समाजसुधारक व क्रांतिकारक होते. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळते आणि त्यांच्या नावाने चौकाचे नामकरण होणे ही अभिमानाची बाब असून अहिल्यानगर शहरात नव्याने सातत्याने वेगवेगळे चौक व रस्ते निर्माण होत आहे तर त्या चौकांना रस्त्यांना व महामार्गांना नावे देणे गरजेचे आहे त्यामुळे महात्मा फुले च्या बरोबर वीर लहुजी वस्ताद यांचे मोठे योगदान राहिलेले आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

समाजातील शूरवीर आणि क्रांतीचे प्रतीक असलेल्या वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त जुने अप्पू हत्ती चौक या चौकाला वीर लहुजी वस्ताद साळवे चौक असे नामकरण करण्यात आले. या नामकरण फलकाचे अनावरण आमदार जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अंकुश मोहिते, सुरेश बनसोडे, धनंजय जाधव, सुनील उमाप, अशोक गायकवाड, विजय पठारे, जय भोसले, चंद्रकांत काळोखे, सिद्धार्थ आढाव, भारत पवार, पप्पू पाटील, राम काते, राम वडागळे, विशाल चांदणे, प्रकाश वाघमारे, अश्विन खुडे आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. आमदार जगताप म्हणाले, अहिल्यानगर शहरात बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती पुतळे उभारण्यात आलेले आहे व लवकरच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचेही पूर्णाकृती पुतळे उभारले जाणार असल्याचे सांगितले.



## आदर्श आचारसंहिता भंग प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

हिंगोली

वसमत येथे सभा असल्याचे बॅनर लाऊन आदर्श आचारसंहितेचा भंग केल्या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीच्या तिघांवर वसमत शहर पोलिस ठाण्यात शुक्रवारी ता. १४ गुन्हा दाखल झाला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर हा दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, वसमत कळमनुरी नगर पालिकेची निवडणुक प्रक्रिया सुरु असून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राजकिय पक्षांच्या उमेदवारांसोबतच अपक्ष उमेदवारांची धावपळ सुरु आहे. निवडणूक विभागाने रविवारी देखील उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे उमेदवारांची मोठी सोय झाली आहे.

जिल्ह्यात निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी विकास माने, प्रतीक्षा भुते, समाधान घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकाकडून तीनही पालिकांमध्ये कुठेही आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी दक्षता घेतली जात आहे.दरम्यान, वसमत येथील ग्रामीण पोलिस ठाणे व गवळी मारोती मंदिर ते आसेगाव टी पॉईंट रोडवरील दुभाजकावर २२ ठिकाणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सभेचे बॅनर लावण्यात आल्याचे दिसून आले. यावरून वसमत पालिकेचे कर्मचारी अरविंद शिकारी यांनी वमसत शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यामध्ये शहरात बॅनर लाऊन शहराचे विद्रूपीकरण करून आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचे नमुद केले.

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जननायक बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जनजाती गौरव दिन

लिंबागणेश । प्रतिनिधी

क्रांतिकारक, समाजसुधारक, पर्यावरणसंरक्षक आणि आदिवासी समाजाचे शाश्वत प्रेरणस्त्रोत जननायक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शासन आदेशानुसार १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत 'जनजाती गौरव पंधरवडा' राबविण्यात आला. आज दि. १५ रोजी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून 'जनजाती गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शिक्षण, कौशल्य विकास, कला, संस्कृती आणि वारसा या विषयांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळेमध्ये वारली चित्रकला स्पर्धा, आदिवासी वेशभूषा स्पर्धा, तसेच आदिवासी नृत्य या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आदिवासी नृत्यात अल्विना अझिम सय्यद, शिवकन्या अंकुश थोरात, रोशनी भारत मुळीक, कार्तिकी शहादेव थोरात, भाग्यश्री बालु थोरात यांनी सहभाग घेतला. आदिवासी वेशभूषेत शिवराज गणेश वायभट, राजवीर महावीर जाधव, शंभू कृष्णा रणखांब, शहानवाज शौकत तांबोळी, सार्थ परमेश्वर रणखांब, तौफीक फिरोज तांबोळी यांनी आकर्षक सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, तसेच पत्रकार हरिओम क्षीरसागर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती गिते, श्रीमती अयाचित, श्रीमती सानप यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, "बिरसा मुंडा हे केवळ आदिवासी नव्हे तर संपूर्ण भारताच्या सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाच्या चळवळीचे प्रतीक आहेत. अवघ्या २५ वर्षांच्या अल्पायुष्यात त्यांनी ब्रिटिश सत्तेला हादरा देत आदिवासी समाजात हक्क, संघटन, स्वाभिमान आणि पर्यावरण संरक्षणाची जाज्वल्य जाणीव निर्माण केली. ब्रिटीश सत्तेने झारखंड, ओडिशा, बिहार परिसरातील आदिवासींवर केलेल्या अन्यायाविरुद्ध त्यांनी "आपली जमीन आपलं राज्य" हा संघर्ष उभारला, असेही त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमास विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





## बिबट्याची दहशत वाढली; आठवडाभरात तिसरा हल्ला, इसळक शिवारातमुलगा जखमी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचा सुळसुळाट वाढला आहे. कोपरगावसह अहिल्यानगर तालुक्यात आठवडाभरात बिबट्याने हल्ला केल्याची तिसरी घटना समोर आली. इसळक शिवारात राजवीर कोतकर या आठ वर्षीय मुलावर बिबट्याने झडप घातली, ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या घटनेत राजवीर गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी अहिल्यानगर शहरात खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बिबट हल्ल्याच्या वाढत्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये तिव्र संताप असून, बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.



जिल्ह्यातील बिबट्यांकडून मानवी वस्तीत हल्ले वाढले आहेत. आठवडाभरापूर्वी कोपरगाव तालुक्यातील टाकळी फाटा शिवारात ऊसतोड मजुराच्या मुलीवर हल्ला करून तिला ठार केले होते. त्यानंतर सोमवारी (१० नोव्हेंबर) याच तालुक्यात येसगाव येथे घास कापणाऱ्या शांताबाई निकोले या ६० वर्षीय महिलेवर झडप घातली होती, त्यात या वृद्धेचा मृत्यू झाला. अहिल्यानगरमध्ये खारे कर्जुने शिवारात बुधवारी (१२ नोव्हेंबरला) एका चिमुरडीला ओढून नेत ठार केले. एकापाठोपाठ एक घटना घडत असल्याने वनविभागाचे पथक घटनास्थळी तळ ठोकून आहे. परंतू, बिबट्या जेरबंद करण्यात अद्याप यश आले नाही. शुक्रवारी (१४ नोव्हेंबर) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास इसळक येथे आठवर्षीय राजवीरवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात राजवीर गंभीर जखमी झाला. बिबटे तुम्ही मारा, नाहीतर आम्ही मारू राजवीर रामकिसन कोतकर हा मुलगा लघुशंकेसाठी गेला असताना त्याच्यावर अचानक हल्ला केला. सरकारने या बिबट्यांना मारावे, किंवा आम्हाला मारण्याचे अधिकार द्यावेत. अन्यथा आम्ही धरून, सर्व वरिष्ठ अधिकारी अन्? मंत्र्यांच्या बंगल्यात नेऊन सोडू. घरापुढे येऊन बिबट्या हल्ला करतो.

# अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत अध्यक्षपदाचे उमेदवारच गुलदस्त्यात

## नगरपालिका निवडणुकीमध्ये सर्वच पक्ष संभ्रमात

बीड । प्रतिनिधी

अर्ज दाखल करण्यासाठी सोमवारी हा शेवटचा दिवस असताना बीड शहरातील सर्वच पक्षाचे उमेदवार जाहीर करण्यात आले नाहीत. जर अध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर नसेल तर नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे काय? असा प्रश्न निर्माण होत असून बीड सह परळी, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव, गेवराई आदी ठिकाणी अशीच अवस्था आहे. गेवराई आणि अंबाजोगाई वगळता सर्वच ठिकाणी अध्यक्षपदाचे उमेदवार अद्याप जाहीर नसल्याने सर्वच पक्षाचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत. गेवराई आणि अंबाजोगाईत मात्र उमेदवार निश्चित झाले असून ते कामालाही लागले आहेत. बीड शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट, भाजपा, शिवसेना पक्षांमध्ये उमेदवाराबाबत एकमत होत नसल्याने आणि नेत्यांनी उमेदवारी जाहीर न केल्याने शेवटच्या दिवसापर्यंत सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असतानाही उमेदवार जाहीर नाहीत. त्यामुळे नेमका कोणाचा प्रचार करायचा असा प्रश्न सर्वांना पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनेकजण उमेदवारी साठी दावा करत आहेत. बीड शहराचे नगराध्यक्षपद मागासवर्गीय महिलेसाठी राखीव असल्याने आणि सर्वसमावेशक उमेदवार सापडत नसल्याने अनेक पक्ष संभ्रमात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या गटांमध्ये आता अनेक घडामोडी चालू असून त्यांचाही उमेदवार निश्चित नाही. शिवसेना दोन्ही गटाची तीच अवस्था आहे. भाजपाचा उमेदवार अद्याप निश्चित झालेला नाही. त्यामुळे बीड शहरांमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी संभ्रम आहे. नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर झाला नाही तर नगरसेवक पदाचे काय असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. ज्यांना उमेदवारी मिळण्याची खात्री आहे अशा अनेकांनी ऑनलाईन उमेदवारी अर्ज दाखल करून ठेवले आहेत. ऐनवेळी घाई नको म्हणून अनेकांनी ही खबरदारी घेतली आहे. मात्र नगराध्यक्ष पदाचा उमेदवार अध्यक्ष जाहीर होत नाही.



आज अनेक पक्षाचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता दिसत आहे. त्यातही अनेक पक्षांमध्ये अनेक घडामोडी चालू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश शिरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा राजीनामा दिल्याने खळबळ माजली आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा नेता कोण? असा संभ्रम निर्माण झाला आहे. अजित पवार गटाला आता नेताच नसल्याने नेमके नेतृत्व कोणी करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. आगामी काळात डॉ. योगेश क्षीरसागर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डॉ. योगेश क्षीरसागर हे भाजपाच्या पॅनल बरोबर राहतील अशी चर्चा शहरात चालू आहे. मात्र सध्या बीड शहरामध्ये चांगली स्थिती असलेल्या आमदार संदीप क्षीरसागर यांच्या गटात अद्याप शांतता आहे. ऐनवेळी संदीप क्षीरसागर उमेदवारी कोणाच्या पारड्यात टाकतात. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीड शहरामध्ये संदीप क्षीरसागर यांना चांगले वातावरण आहे. त्यामुळे संदीप क्षीरसागर यांच्याकडून उमेदवार कोण येतात ? याकडेच जास्त लक्ष आहे. अजित दादा पवार गटाला लिड करणारा कोणी राहिला नाही तर हे नेतृत्व आपसूकच माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे जाईल अशी शक्यता आहे. गेवराई नगरपालिकेमध्ये बाळराजे पवार आणि माजी मंत्री बदामराव पंडित एकत्र आल्याने त्यांना गेवराई मध्ये फारसा वाव नाही. त्यामुळे त्यांचे लक्षही आता बीड कडे लागले आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचा काही भाग बीड तालुक्यामध्ये येतो आणि माजी आमदार अमरसिंह पंडित हे शहरात राहत असल्याने आणि काही कार्यकर्त्यांची टीम त्यांच्यासोबत असल्याने बीड शहरातील नगरपालिकेमध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी ते आगामी काळात प्रयत्न करतील अशी शक्यता दिसत आहे. शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये सध्या शांतता आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडे अद्याप उमेदवार नाही तसीच परिस्थिती उबाठा गटाची आहे. याबरोबर भाजपाचा उमेदवार कोण द्यायचा हे अध्याप निश्चित झालेले नाही. आगामी काळामध्ये जर डॉ. योगेश शिरसागर हे भाजपच्या बरोबर गेले तर भाजपाची कमान डॉ. क्षीरसागर यांच्या हातात येईल अशी शक्यता आहे. ◀◀ पान ३ वर

## शिवसेना सज्ज; निरीक्षक मनोज शिंदे यांच्या उपस्थितीत इच्छुक उमेदवारांची निर्णायक बैठक



**शिवसेनेशी प्रामाणिक राहून लढा; निरीक्षक मनोज शिंदे यांचे आवाहन**


बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिका निवडणुकीच्या रणांगणात शिवसेनेच्या सक्षम उमेदवारांचाफौजफाटा उभा केला आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशावरून काल दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बीडमध्ये निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे, बापूसाहेब मोरे बीड जिल्हा संपर्काप्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत इच्छुक उमेदवारांची निर्णायक बैठक पार पडली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले तर निरीक्षक मनोजजी शिंदे लोकसभा संपर्कप्रमुख ठाणे, बापूसाहेब मोरे बीड जिल्हा संपर्काप्रमुख यांनी उमेदवारांना मार्गदर्शन करत मुक्त संवाद साधला. शिवसेनेशी आणि स्वतःशी प्रामाणिक राहून निवडणूक ◀◀ पान ३ वर

## ग्रामपंचायत कार्यालयात तोडफोड, महत्वाचे दस्तऐवज पेटवून दिल्याने खळबळ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे रात्रीच्या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश करत महत्त्वाचे दस्तऐवज पेटून दिल्याची खळखबळ घटना सुलेमान देवळा येथे उघडकीस आली आहे. आगीत ४० ते ५० रजिस्टर व महत्वाचे दस्तऐवज, फाइल जळून खाक झाले आहेत. कोणी व कोणत्या कारणांसाठी हे कृत्य केले याबाबत अद्याप अधिकृत माहिती कळू शकली नाही.




आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील एका दारूने झिंगलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान हातात कुऱ्हाड घेऊन ग्रामपंचायतीचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून महत्त्वाचे दस्तऐवज अस्ताव्यस्त करत पेटवून दिले खाक झाले आहेत, अशी माहिती गावकऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी त्र्यंबक मुळीक यांना दिली.

४० ते ५० रजिस्टर व महत्वाचे दस्तऐवज, फाइल जत दरम्यान, आज ग्रामविकास अधिकारी मुळीक, सरपंच दादा यदु घोडके, अतुल पोपट घोडके, भिमराव सुखदेव भादवे, सचिन भगवान खोरदे, नवनाथ, एकनाथ भोजे या पंचाच्या उपस्थितीत नुकसानीचा पंचनामा करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी मुळीक यांनी सांगितले.

## स्व.डॉ.संपदा मुंडे यांच्या कुटुंबास संजय आंधळे मित्र मंडळच्या वतीने आर्थिक मदत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे वास्तव्यास असलेले शेतकरी श्रीकृष्ण मुंडे यांची मुलगी स्वर्गीय डॉक्टर संपदा मुंडे यांनी फलटणमध्ये आत्महत्या केली का त्यांचा खून केला या प्रकरणामुळे महाराष्ट्रात व संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि वडवणी तालुक्यामध्ये एक प्रकारची शोककळा पसरली होती त्यामुळे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बीड जिल्हाध्यक्ष मा.श्री.संजय भाऊ आंधळे यांनी आपला



वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात येणारे सर्व सामाजिक उपक्रम व कार्यक्रम रद्द करून स्व. डॉक्टर संपदा मुंडे यांच्या कुटुंबास आर्थिक मदत करण्याचा निर्णय संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ वडवणी तालुका व भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स वडवणी यांच्या वतीने घेण्यात आला कवडगाव येथे जाऊन ४१००० हजार रुपयांची आर्थिक मदत स्व. डॉक्टर संपदा मुंडे यांच्या कुटुंबाला संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ व भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स वडवणी यांच्या वतीने सुपूर्त केली.

यावेळी ◀◀ पान ३ वर

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी रविवारी ऑफलाईन नामनिर्देशनपत्र स्वीकारणार

मुंबई । प्रतिनिधी

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी इच्छूक उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे ऑनलाईन; तसेच ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा उद्यादेखील (रविवारी, ता. १६) स्वीकारली जातील, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी ऑनलाईनबरोबरच ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा नामनिर्देशनपत्र सादर करण्याची सवलत देण्यात आली आहे. त्याचबरोबर सुट्टीच्या दिवशी म्हणजे रविवारी (ता. १६) देखील सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचे आदेश सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. नामनिर्देशनपत्र व शपथपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. अधिकाधिक इच्छूक उमेदवारांनी रविवारीच नामनिर्देशनपत्रे दाखल केल्यास अखेरच्या दिवशी ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल, असेही राज्य निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे.

## आ.सोळंकेच्या राष्ट्रवादीला धक्का; विद्यमान नगरसेवकाचा जगतापाच्या राष्ट्रवादीत प्रवेश !

माजलगाव । प्रतिनिधी

आमदार प्रकाश सोळंके यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निवडणुकीच्या धामधुमीत पहिलाच झटका देत. मोहन जगताप यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विद्यमान नगरसेवकाला प्रवेश घडवून आणला. यातून एक प्रकारे पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फोडाफोडीचा श्रीगणेशा जगताप यांनी केला आहे.

माजलगाव नगर परिषद निवडणुकीची निवडणूक चांगलीच जोर धरत आहेत. यातच अनेक ठिकाणी प्रभागात झालेल्या फेरबदल व आरक्षण बदलामुळे विद्यमान



नगरसेवक, भावी उमेदवारांचे गणित बिघडले. त्यामुळे आत्ता जो तो आपली उमेदवारी शाबुत ठेवण्यासाठी भावी, विद्यमान नगरसेवकांनी पक्ष बदलासाठी चाचपणी करत असल्याचे कळते. मात्र यात पहिला पाऊल मोहन जगताप यांनी टाकत आमदार प्रकाश सोळंके यांना धक्का देत, त्यांचे खंदे समर्थक विद्यमान नगरसेवक भागवत भोसले यांनी जगतापांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यामुळे फोडाफोडीचे सुरुवात मोहन जगताप ह्यांनी केली असल्याने प्रकाश सोळंके काय करतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## हरवलेल्या दोन मुलासह आईला अवघ्या २४ तासात शोध लावून पतीच्या स्वाधीन केले

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पांढरी गावातील महिला १३ नोव्हेंबर रोजी आष्टी बस स्थानक मध्ये आपल्या दोन मुलासह पुण्याकडे निघालेली आसताना या महिलेला थोडे डोक्यामध्ये चक्कर असल्याने इतर गाडीत ती बसली ती महिला पाटोदा तालुक्यातील जालिंदरनाथ गडावर गेली. येवलेवाडी या ठिकाणी गेली यावर आष्टी पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची

**कर्तव्यदक्ष पोलीस हेड कॉन्स्टेबलची उत्कृष्ट कामगिरी**



तक्रार दाखल करण्यात आली होती यावरून आष्टी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांनी श्री गणेश राऊत यांना या महिलेच्या शोधण्याची जबाबदारी टाकली यावर अवघ्या २४ तासात बस स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे राऊत यांनी महिलेचा शोध लावला व ही महिला व तिचे दोन मुले तिच्या घरच्यांच्या व पतीच्या स्वाधीन केले यावरून ◀◀ पान ३ वर

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने केली अल्पवयीन पीडितेची सुटका

### पोउपनि पल्लवी जाधव व त्यांच्या टीमने केली कार्यवाही,आरोपी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दिंद्रूड परिसरातील एका अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या तरुणासह या मुलीची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सुटका करून आरोपीला ताब्यात घेतले. ही कारवाई पोउपनि पल्लवी जाधव व त्यांच्या टीमने केली.

पोस्टे दिंद्रूड गुन्हा रजिस्टर नंबर ०२/२०२४ कलम ३६३, ३७० भादवी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. फिर्यादी तसेच आरोपीचे नातेवाईक यांच्या चौकशी दरम्यान त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली. सदर



माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सोलापुर जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १३/११/२०२५ रोजी दुपारी ची टीम ही पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने सोलापूरकडे रवाना झाली. सोलापूर येथे पोहोचल्यावर रात्रीच्या अंधारात टीम पीडित व आरोपीचा शोध घेत होती, शेवटी सकाळी तीन वाजता पीडित मुलगी व आरोपी हे दोघे केडगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथे मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन पोस्टे करमाळा येथे हजर केले व टीम बीड कडे रवाना झाली. त्यानंतर ची टीम पोस्टे दिंद्रूड येथे आली व सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोलीस स्टेशनला हजर केले. सदर कार्यवाही ◀◀ पान ३ वर

# संभाजीनगर परिक्षेत्रात बीड जिल्हा पोलीसांचा नावलौकीक

## बीड पोलीसांनी पटकावले ५८ पदके, पोलीस अधीक्षक फुटबॉल टिममध्ये

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या ३६ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत बीड जिल्हा पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण द्वितीय पारितोषिक मिळवून जिल्ह्याचा मान उंचावला आहे. विशेष म्हणजे यंदा पुरुष गटाबरोबरच महिला गटातही बीड पोलिसांनी द्वितीय क्रमांक पटकावण्याचा ऐतिहासिक निकाल साध्य केला आहे. बीड जिल्हा पोलीस दलाने महीला व पुरुष संघांनी एकुण ५८ पदकांची कमाई करुन परिक्षेत्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबवतपोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी स्वतः फुटबॉल संघात सहभागी होत खेळाडूंचे मनोबल उंचावले. त्यांच्या उपस्थितीमुळे संघांमध्ये उत्साहाचे नवे संचार झाले. बीड जिल्हा पोलीस दलाच्या पुरुष संघाने विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले.

### प्रथम पुरस्कार

फुटबॉल -सांघीक
४०० मिटर धावणे -अफजल पठाण
१० किमी. धावणे -बालाजी मुगले
४०० मिटर अडथळा शर्यत -अफजल पठाण
गोळा फेक -युवराज पवार
४४०० रीले -सांघीक
जलतरण फ्रिस्टाईल ४०० मिटर -संकेत डोंगरे
४०० मिटर धावणे -गोविंद नायकुडे
बॉक्सींग -राहुल काकडे
बॉक्सींग -श्रीनिवास नागरगोजे
कुस्ती -निखील जाधव
वु-शु -राहुल काकडे, हॉकी -सांघीक, कबड्डी -सांघीक

### प्रथम पुरस्कार (महिला

पॉवर लिफ्टींग-माधुरी वाळके
बॉक्सींग-कांचन बहीरवाळ
वेट लिफ्टींग-मोहीनी बोळवे
वेट लिफ्टींग-प्रतीभा राऊत
ज्युदो-सोनाली गायकवाड
ज्युदो-वैष्णवी माळी
खोखो-सांघीक
पॉवर लिफ्टींग-सरस्वती शिंदे
पॉवर लिफ्टींग-अश्विनी कल्हाळे
पॉवर लिफ्टींग-रुपाली डोंगरवार
बॉक्सींग-मोहीनी बहीरवाळ
वेट लिफ्टींग-मोहीनी बहीरवाळ
वेट लिफ्टींग-अश्विनी सातपुते
ज्युदो-काजल रंधवे
ज्युदो-अश्विनी सातपुते
ज्युदो-दिव्या राठोड
ज्युदो-अमृता पिंपरे
बॉक्सींग-अमृता पिंपळे
बॉक्सींग-कोमल लोंढे
बास्केटबॉल-सांघीक, कबड्डी-सांघीक



बीड जिल्हा पोलीसांच्या संघांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्वत: फुटबॉल संघाचे नेतृत्व केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# वारंवार होणाऱ्या अपघातामुळे नवले पुलाच्या सुरक्षेबाबत प्रश्न

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील नवले पुलावर गुरुवारी झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नवले पुलाच्या सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण होत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांच्या मदतीची घोषणा राज्य सरकारने केली आहे.



अपघातात काही क्षणांतच ८ जण जळून खाक झाले

बंगळुरू पुणे महामार्गावर नवले पूल परिसरात गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघाताने शहर हादरलं. ही संध्याकाळ आठ निष्पाप जीवांसाठी 'काळ' ठरली. घटनास्थळी पसरलेला काळोख, वाहनांचे चेंदामेंदा झालेले अवशेष आणि जखमींच्या नातेवाइकांचा हंबरडा हे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. दोन कंटेनर आणि एका कारच्या झालेल्या जबरदस्त अपघातात काही क्षणांतच ८ जण जळून खाक झाले, तर तब्बल २० जण जखमी झाले. गुरुवारी (दि. १३) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कात्रज बोगद्याकडून नवले पुलाकडे येणाऱ्या महामार्गावर हा अपघात झाला. या अपघातात मृत्यू झालेल्या ८ जणांमध्ये एक ३ वर्षांच्या चिमुकलीचाही समावेश आहे.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, एक कंटेनर उतारावर भरधाव वेगात जात असताना अचानक त्याचे ब्रेक फेल झाले. त्यातच कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने या कंटेनरने समोर असलेल्या १० ते १५ वाहनांना जोरदार धडक दिली. दरम्यान, प्रामुख्याने कंटेनरने एका ट्रॅव्हलर बसला धडक दिल्याने ट्रॅव्हलर पलटी झाला. त्यामध्ये १८ ते २० प्रवासी होते. धडकेनंतर कंटेनरच्या डिझ्रेल टँकला आग लागली आणि काही क्षणांतच आगीचे लोट आकाशात झेपावले. सेल्फी पॉइंटजवळ एका टुरिस्ट कारला कंटेनरने पाठीमागून धडक दिली, कार पुढे उभ्या दुसऱ्या कंटेनरमध्ये कार अडकली आणि तिने पेट घेतल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.



## नवले पुलावर बोंबाबोंब व 'तिरडी आंदोलन'; वाढत्या मृत्यूंवर नागरिकांचा तिव्र संताप

पुणे । प्रतिनिधी

मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर नऱ्हे परिसरात वाढत चाललेल्या अपघातांच्या मालिकेमुळे निष्पाप लोकांचे जात असलेल्या बळींमुळे येथील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाविरोधात नवले पुलाजवळ बोंबाबोंब व 'तिरडी आंदोलन' करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. या वेळी अंत्ययात्रा आणि अंत्यविधीचे प्रतीकात्मक आयोजन करून नागरिकांसह त्यांनी शासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, अपघातात लहान मुलीसह कुटुंबाची झालेली होरपळ पाहून मोरे भावुक होऊन म्हणाले, या भागात मृत्यूंची मालिका सुरू आहे. प्रशासन काहीच करत नाही. असेच चालू राहिले तर लोकांना जगण्यापेक्षा आत्महत्या करावीशी वाटेल, नऱ्हे-धायरी-वडगाव आणि आसपासचे नागरिकही भीतीच्या सावटाखाली आहेत. या वेळी मोठ्या संख्येने आंदोलनात नागरिक सहभागी झाले होते. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आंदोलनादरम्यान भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना कराव्यात, रस्त्यांची पाहणी करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, महेश गाडगे, सुशील भागवत, आनंद थेऊरकर, सुदर्शन देशमाने, सोनाली नायर यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

## पुण्यात अनोखी मध्यस्थी; अमेरिकेत असलेल्या पतीशी व्हिडिओ कॉलवर चर्चा, घटस्फोटाचा दावा निकाली

पुणे : अधुनिक तंत्रज्ञानामुळे जगात अनेक बदल झाले आहेत. हे बदल आता न्यायालयीन कामकाजात दिसून येत आहेत. न्यायालयाकडून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. आता मध्यस्थीसाठीही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. पहिल्यांदाच व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे अमेरिकेतील व्यक्तीशी संवाद साधून मध्यस्थी करण्यात आली. पती-पत्नीचा दावा घटस्फोटाद्वारे निकाली काढण्यात आला. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे मुख्य मध्यस्थ ड. अतुल गुंजाळ यांनी या प्रकरणात यशस्वी मध्यस्थी केली.



माधव आणि माधवी (नावे बदलली आहेत) यांचा विवाह २०२२ मध्ये झाला. दोघेही उच्चशिक्षित आहेत. तो आयटी क्षेत्रात अभियंता आहे. तर ती डॉक्टर आहे. वैचारिक मतभेदामुळे काही दिवसातच दोघांचे पटेनासे झाले. अवघ्या सहा महिन्याच्या कालावधीत दोघे वेगळे राहू लागले. त्याने २०२२ मध्येच घटस्फोटासाठी ड. निकिता अगरवाल यांच्यामार्फत दावा दाखल केला. तर तिच्या वतीने ड. विनोद अंबड व ॲड. जयश्री काळे पालवे हजर झाले.

हा दावा जिल्हा न्यायाधीश एस.बी. शेलार यांच्या न्यायालयात प्रलंबित होता. तेथून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे मध्यस्थीसाठी पाठविण्यात आला. प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश सोनल पाटील यांनी हा दावा ड. अतुल गुंजाळ यांच्याकडे मध्यस्थीसाठी पाठवला. माधव सध्या अमेरिकेतील मिशिगन शहरात नोकरीस आहे.

चर्चे अंती सुमारे ३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दाव्यात दोघे घटस्फोटासाठी तयार झाले. माधव अमेरिकेत असल्याने त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क केला. त्याने ऑनलाईन घटस्फोटासाठी संमती दर्शविली. त्यानंतर ई-मेलवरूनही त्याची संमती घेण्यात आली. थोडक्यात माधव अमेरिकेला असूनही तो प्रत्यक्षात हजर न राहता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे केस निकाली निघाली.

मध्यस्थीमुळे जिंकले, हरल्याची भावना राहत नाही. दावा निकाली निघाल्यामुळे न्याय संस्थेवरील ताण कमी होतो. वेळ, पैशाची बचत होते. होणाऱ्या मानसिक त्रासातून पक्षकारांची मुक्तता झाली. आता दोघेही स्वतंत्र्यपणे आयुष्य जगण्यास मोकळे आहेत.

ॲड.अतुल गुंजाळ, मुख्य मध्यस्थ, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

## अवघ्या तीन महिन्यांचं लेकरु पोरकं झालं; बापाचं छत्र कायमचं गेलं : नवले ब्रीज अपघातात मराठी अभिनेत्याचा दुर्दैवी अंत

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील नवले पुलावजळ झालेल्या भीषण अपघाताने पुणेकरांना थक्क केले. गुरुवारी १३ नोव्हेंबरच्या दिवशी सायंकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास घडलेली भीषण अपघाताची घटना सर्वांनाच्या मनाला चटका लावून गेली. या अपघातात एकूण आठ जणांना आपल्या जीवाला मुकावे लागले. या अपघातात एका मराठी अभिनेत्याचा देखील मृत्यू झाला आहे.



कारचालक असलेला ३० वर्षीय मराठी अभिनेता धनंजय कोळी याचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोन ट्रकच्या मधोमध अडकलेल्या कारमधील पाच जणांना बाहेर पडता आले नाही. अचानक आग लागल्याने सर्वजण आगीत जीवाच्या आकांताने ओरडत होरपळून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धनंजय सहा महिन्यापासून वाहतूकीचा व्यवसाय करत होता. मूळचा तो कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूरचा होता. पण पुण्यात राहत होता. त्याच्या अकाली जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

धनंजयने काही नाटकांमध्ये काम केले आहे. त्याच्या इन्स्टाग्राम प्रोपाईलवरती त्याने स्वतःचा उल्लेख अभिनेता म्हणून केला आहे. गेल्या काही वर्षांपासून पिंपरी-चिंचवड परिसरातील चिखली येथे धनंजय राहत होता. अपघात धनंजयचा बळी गेल्याने त्यांच्या तीन महिनांच्या मुलावरचे वडिलांचे छत्र हरपले आहे, तो वडिलांच्या प्रेमाला पोरका झाला आहे, अशी भावना त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली. धनंजयच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. काही दिवसांपूर्वीच धनंजयच्या पत्नीने त्याच्यासह डोहाळ जेवणाची पोस्ट केली . ही पोस्ट ठरली. हसऱ्या कुटुंबावर धनंजयच्या जाण्याने मोठा आघात झाला आहे.

सीसीटीव्हीची तपासणी

नवले पुलावर नेमका अपघात कसा झाला, यादृष्टीने तपास सुरू आहे. ट्रकचालकाने मद्यप्राशन केले होते का?, यादृष्टीने तपास सुरू आहे. भरधाव वेगामुळे नियंत्रण सुटल्याने ट्रकने एकापाठोपाठ वाहनांना धडक दिली असून, पोलिसांनी नवले पूल परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## ट्रॅक्टरच्या धडकेत शाळकरी मुलाचा जागीच मृत्यू, आई आणि भाऊ गंभीर जखमी

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिक्रापूर (ता. शिरूर) येथे पाबळ चौकात झालेल्या भीषण अपघातात ११ वर्षीय कार्तिक राजाभाऊ चव्हाण या शाळकरी मुलाचा मृत्यू झाला असून, त्याची आई व भाऊ जखमी झाले आहेत. दुचाकीला ट्रॅक्टरच्या ट्रॉलीने दिलेल्या जोरदार धडकेमुळे हा अपघात घडल्याची माहिती मिळाली आहे. ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून पसार झाला असून पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गीता राजाभाऊ चव्हाण या आपल्या एमएच १२ टीबी ६१४९ या दुचाकीवरून दोन्ही मुलांना – कार्तिक व आर्यन – जिल्हा परिषद शाळा, कोयाळी पुनर्वसन येथे सोडण्यासाठी जात होत्या. पाबळ चौकातून जात असताना, शिक्रापूरहून पाबळकडे जाणार्या एमएच १२ पीझेड ३५४० या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीची त्यांच्या दुचाकीला धडक बसली. धडकेचा जोर इतका होता की दुचाकीवरील तिन्ही जण रस्त्यावर फेकले गेले. आसपासच्या नागरिकांनी तातडीने तिघांनाही जवळील रुग्णालयात दाखल केले; परंतु कार्तिक चव्हाण (वय ११) याला उपचारापूर्वीच मृत घोषित करण्यात आले. तर गीता राजाभाऊ चव्हाण (वय २९), आर्यन राजाभाऊ चव्हाण (वय १०) हे जखमी झाले आहेत. ट्रॅक्टर चालक अपघातानंतर वाहनासह फरार झाला. या संदर्भात कार्तिकचा वडील राजाभाऊ भारत चव्हाण यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे व विश्वांबर वाघमारे करीत आहेत.

## नवले पुलावरील अपघात रोखण्यासाठी 'रिंगरोड'ला प्राधान्य : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

नवले पुलावरील अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करूनही त्याचे प्रमाण कमी होत नाही. या पुलाजवळील तीव्र उताराचा भाग कमी करणे शक्य नाही. त्यावर दोन पर्याय पुढे आले आहेत. त्यापैकी 'एमएसआरडीसी'ने हाती घेतलेल्या पश्चिम भागातील उर्से ते शिवरे या टप्प्यातील रिंगरोडमधील शिवरे ते कासार अंबोली यादरम्यान २२ ते २५ किलोमीटर रस्त्याचे काम एक वर्षात पूर्ण करणे, हा पर्याय असून त्याला प्राधान्य देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.



२०२२ मध्ये रस्ता सुरक्षा समितीने नवले पुलाजवळील अपघात कमी करण्यासाठी विविध उपयोजना सुचविल्या होत्या. त्या सर्व उपयोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले आहे. साताऱ्याकडून येताना नवले पुलाजवळ तीव्र उतार आहे. तो कसा कमी करता येईल, यावर दोन दिवसांपूर्वीच चर्चा झाली होती. परंतु, तो कमी करणे शक्य नाही, असे महामार्ग प्राधिकरणाकडून सांगण्यात आले, अशी माहिती जिल्हाधिकारी डुडी यांनी दिली. दरम्यान, एमएसआरडीसीने पश्चिम भागातील रिंगरोडचे काम सुरू केले आहे. उर्से ते कासार अंबोलीदरम्यान ६४ किलोमीटरचा एक टप्पा आहे. या टप्प्यात खेडशिवापूर टोलनाक्याच्या पुढे आल्यानंतर शिवरेपासून कासार-अंबोली या दरम्यानचे २२ ते २५ किलोमीटर रिंगरोडचे काम प्राधान्याने पूर्ण करणे. रिंगरोडसाठी भूसंपादन यापूर्वीच झाले आहे. त्यामुळे हे काम एक ते दीड वर्षात पूर्ण होऊ शकते, हा पुढील आठवड्यात या संदर्भात एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेण्यात येणार असून, प्रत्यक्ष जागेवरही पाहणी करण्यात येणार आहे. हे काम झाल्यावर साताऱ्यावरून येणारी सर्व जड वाहने नवले पूल मार्गे न येता थेट पौड येथील कासार अंबोली येथून पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे येथे जातील, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

## एआयएसएसएमएस अभियांत्रिकी'च्या विद्यार्थ्यांची जपानमध्ये भरारी; ११ जणांची आंतरराष्ट्रीय निवड


**पुणे । प्रतिनिधी**

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयातील अकरा सिव्हिल, अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांची निवड जपानमधील नामांकित टाकामात्सु कन्स्ट्रक्शन ग्राप या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीमध्ये झाली आहे. पहिल्यांदाच टाकामात्सु कन्स्ट्रक्शन ग्राप, जपानमध्ये भारतीय संस्थेसोबतच्या सहयोगातून प्रारंभिक तुकडीची भरती करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अपूर्वा मुर्कुटे, अदिती नलावडे, सानिका पवार, आयुष परब, अदिनाथ गवदसे, प्रणव तेर्डाळ, आदित्य पाडुळे, ऋषिकेश परदेशी, राजवर्धन पवार, धुव सबडे आणि अथर्व काळे यांचा समावेश आहे. या निवडीमुळे संस्थेचे सचिव मालोजीराजे छत्रपती (एआयएसएसएम सोसायटी) यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले, तसेच विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले.

प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे यांनी या यशाचे श्रेय वर्षभर राबविण्यात येणाऱ्या स्टुडन्ट्स क्लबच्या उपक्रमांना आणि महाविद्यालयाच्या अखंड पाठबळाला दिले, जे उत्कृष्टता व व्यावसायिक प्रगतीसाठी प्रेरक ठरते. प्रशिक्षण व रोजगार अधिकारी रुतविज जाधव आणि सहायक अधिष्ठाता डॉ. शिल्पी भुइंया यांनी या आंतरराष्ट्रीय भरती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व टाकामात्सु कन्स्ट्रक्शन ग्रापशी समन्वय साधून संपूर्ण प्रक्रिया सुरळीत रितीने पार पाडली. सिव्हिल अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. पी. बी. नांगरे यांनी विद्यार्थ्यांच्या या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल निष्ठा, शिस्तबद्धतेची व परिश्रमशीलतेची प्रशंसा केली. महाविद्यालयाने डॉ. एस. एच. वानखडे, अधिष्ठाता - आंतरराष्ट्रीय संबंध यांच्या मोलाच्या योगदानाचेही कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक उद्योगांशी संलग्न होण्यासाठी उपयुक्त सहकार्य व संधी उपलब्ध करून दिल्या.

## अमेरिकेत असलेल्या पतीशी व्हिडिओ कॉलवर चर्चा, घटस्फोटाचा दावा निकाली

**पुणे । प्रतिनिधी**



अधुनिक तंत्रज्ञानामुळे जगात अनेक बदल झाले आहेत. हे बदल आता न्यायालयीन कामकाजात दिसून येत आहेत. न्यायालयाकडून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. आता मध्यस्थीसाठीही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. पहिल्यांदाच व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे अमेरिकेतील व्यक्तीशी संवाद साधून मध्यस्थी करण्यात आली. पती-पत्नीचा दावा घटस्फोटाद्वारे निकाली काढण्यात आला. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे मुख्य मध्यस्थ ड. अतुल गुंजाळ यांनी या प्रकरणात यशस्वी मध्यस्थी केली.

माधव आणि माधवी (नावे बदलली आहेत) यांचा विवाह २०२२ मध्ये झाला. दोघेही उच्चशिक्षित आहेत. तो आयटी क्षेत्रात अभियंता आहे. तर ती डॉक्टर आहे. वैचारिक मतभेदामुळे काही दिवसातच दोघांचे पटेनासे झाले. अवघ्या सहा महिन्याच्या कालावधीत दोघे वेगळे राहू लागले. त्याने २०२२ मध्येच घटस्फोटासाठी ड. निकिता अगरवाल यांच्यामार्फत दावा दाखल केला. तर तिच्या वतीने ड. विनोद अंबड व ड. जयश्री काळे पालवे हजर झाले. हा दावा जिल्हा न्यायाधीश एस.बी. शेलार यांच्या न्यायालयात प्रलंबित होता. तेथून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे मध्यस्थीसाठी पाठविण्यात आला. प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश सोनल पाटील यांनी हा दावा ड. अतुल गुंजाळ यांच्याकडे मध्यस्थीसाठी पाठवला. माधव सध्या अमेरिकेतील मिशिगन शहरात नोकरीस आहे. चर्चे अंती सुमारे ३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दाव्यात दोघे घटस्फोटासाठी तयार झाले. माधव अमेरिकेत असल्याने त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क केला. त्याने ऑनलाईन घटस्फोटासाठी संमती दर्शविली. त्यानंतर ई-मेलवरूनही त्याची संमती घेण्यात आली. थोडक्यात माधव अमेरिकेला असूनही तो प्रत्यक्षात हजर न राहता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे केस निकाली निघाली.

## अनैतिक संबंधातून प्रेयसीचा गळा चिरून निर्घृण खून; आरोपी फरार

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

शिरोली (शिंदेवस्ती, ता. खेड) येथे अनैतिक संबंधातून प्रियकराकडून ४६ वर्षीय विवाहित प्रेयसी महिलेचा धारदार हत्याराने गळा चिरून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.ही घटना गुरुवारी (दि. १३) रात्री ११.२० वाजण्याच्या सुमारास घडली. खेड पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत महिलेचे नाव रूपाली विलास वाडेकर (वय ४६, रा. कल्याण, जि. ठाणे) असे आहे. ती मूळची ठाणे जिल्ह्यातील असली तरी गेल्या काही दिवसांपासून खेड येथील प्रियकराच्या घरी वास्तव्यास होती असे स्थानिक नागरिक व पोलिसांनी सांगितले. खेड पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ललित दिपक खोल्लम (वय ३७, रा. शिंदेवस्ती शिरोली, ता. खेड) हे शिरोली येथील एका इमारतीत दुसर्या मजल्यावर फ्लॅटमध्ये राहत होते. ललित खोल्लम याच्याशी रूपालीचे अनैतिक संबंध होते. दोघांमध्ये सतत भांडणं होत होती. त्याच रागातून ललितने रूपालीचा गळा चिरून खून केल्याचा पोलिसांनी प्राथमिक संशय आहे. रात्री उशिरापर्यंत दोघांमधील भांडणाचे काही आवाज आल्याचे शेजार्यांनी सांगितले. मात्र चौकशी अंती सव्वा अकरा वाजता रक्तबंबाळ अवस्थेत रूपालीचा मृतदेह आढळल्यानंतर एकच खळबळ उडाली.

खेड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार सुदर्शन सुखदेव माताडे यांनी याबाबत फिर्याद दिली असून, ललित खोल्लम याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण हे करीत आहेत, संशयित ललित या घटनेनंतर फरार झाला असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत.

## अंगावर काटा आणणारा थरार! दुचाकीसमोर झाडावरून बिबट्याची झेप, महिला थोडक्यात बचावली

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूरच्या तालुक्याच्या बेट भागातील पिंपरखेड येथे दाभाडे मळा रस्त्यावर गुरुवारी (दि. १३) रात्री साडेसातच्या सुमारास दुचाकीवरून चाललेल्या महिलेच्या समोर बिबट्याने अचानक उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सुदैवाने या हल्ल्यातून ही महिला थोडक्यात बचावली असून या रस्त्यावरील बिबट्याच्या वाढत्या वावर मुळे ग्रामस्थांमध्ये आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गुरुवारी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास सुनिता पवार या गावातून दाभाडेमळा रस्त्यावरून आपल्या दुचाकीने जात असताना रस्त्याच्या कडेला झाडावर दबा धरून असलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यासमोर उडी मारली. हल्ल्याच्या प्रयत्नात असलेल्या बिबट्याला पाहून सुनिता पवार अतिशय भयभीत झाल्या; मात्र प्रसंगावधान राखत त्यांनी लगेच दुचाकी वळवून कशीबशी तेथून सुटका करून घेतली आणि आपला जीव वाचवला. या जीवघेण्या अनुभवानंतर काळ आला होता, पण वेळ आली नव्हती याची प्रचिती आल्याचे त्यांनी सांगितले.पिंपरखेड गावातून दाभाडेमळा व मधला मळ्याकडे जाणारा हा रस्ता असून गावापासून हजार फुटांच्या अंतरामध्ये ओढ्यालगत असलेल्या या रस्त्याच्या दुतर्फा मोठी झाडे आहेत, बिबट्याला लपण्यासाठी आणि वास्तव्यासाठी सुरक्षित जागा आहे. या झाडांवर बिबट्याचे वास्तव्य सातत्याने दिसून येत आहे. या धोकादायक रस्त्यावरून पहिली ते बारावीचे अनेक शालेय विद्यार्थी जीव मुठीत धरून शाळेत जातात. बिबट्याचा हा वाढता वावर आणि चुकीच्या धोकादायक पद्धतीने लावलेली झाडे आता शाळकरी मुलांच्या आणि परिसरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करत आहे. बिबट्याच्या दहशतीने यापूर्वी झाडे काढण्याची मागणी केली होती परंतु त्यावेळी फक्त झाडांची छाटणी करून रस्ता मोकळा केला गेला. मात्र आता बिबट्याने झाडावरून उडी मारत हल्ल्याचा प्रयत्न केल्याने धोकादायक असलेल्या झाडांबाबत पालक व ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. अतिशय चुकीच्या आणि धोकादायक पद्धतीने रस्त्याच्या बाजूला असलेली ही झाडे एखाद्याचा जीव जाण्यापूर्वी वन विभागाने तत्काळ काढून टाकावीत अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे.